शनिवार २७ फेब्रुवारी १९७१

# माणूस

| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
|---|---|---|
| अंक : पासष्टावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
|---|---|---|
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार...

□ आपला दि. ६-२-७१ चा माणूसचा अंक वाचण्यात आला. कै. नाथ पै यांच्या हृद्य आठवणी आणि कै. दीनानाथ दलाल यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारा 'अखेर ही अशी व्हायची होती' हा श्री. रविंद्र पिंगे यांचा लेख, हे या अंकाचे खास आकर्षण ठरावे. तसेच माझा जाहीरनामा हे आपण नवीन सुरू केलेले सदर आणि त्याला वाचकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद, मध्यावधी निवडणुकांविषयी, विभिन्न प्रांतातील पक्षांची कमीअधिक बाजू निःपक्षपातीपणे वाचकांसमोर मांडणारे विचारप्रवर्तक लेख, ह्या सर्वांमुळे माणूसचा अंक हल्ली विशेष वाचनीय असतो. परंतु आपण प्रसिद्ध करीत असलेल्या कथा मात्र मनाचे समाधान करीत नाहीत. या कथांचा निकष कोणता? त्याचप्रमाणे आठवड्यातून दोनदा 'माणूस' प्रसिद्ध न करता तो फक्त एकदाच म्हणजे शनिवार किंवा रविवारी करावा. आणि थोडीफार पृष्ठसंख्या वाढवून त्याची किंमत ५० पैसे ठेवली तरी चालण्यासारखे आहे. ह्या सूचनेचा विचार व्हावा.

१४ फेब्रुवारी, १९७१ — भालचंद्र लातुरकर, वडोदा (नागपूर)

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# सामान्य जनांचा प्रतिनिधी

# चिंताग्रस्त जॉर्ज !

— शुभास्ते पंथानः

कावसजी जहांगीर हॉल. तुडुंब गर्दी, जॉर्ज बसलेला. लांब बाह्यांचा काहीसा मळलेला बुशशर्ट त्याने घातलाय. मधूनमधून कपाळावरचा घाम तो पुसतोय्. हाताची घडी घालून श्रोत्यांकडे पहातोय्. लोकसभेसाठी जॉर्ज फर्नांडीस असं लिहिलेलं एक छोटसं पोस्टर भिंतीवर लावलंय्, एखाद्या मोठ्या पाकिटावर इवलंसं तिकिट असावं तसं ते पोस्टर दिसतंय्. गर्दी वाढते आहे. दोन्ही गॅलऱ्या गच्च झालेल्या. बाहेरही गर्दी. दक्षिण मुंबईतली पहिलीच प्रचार सभा होती ती. किंबहुना सबंध मुंबईतली तो पहिलीच सभा असावी. आधी प्रास्तविक वगैरे. तिकडे कोणाचंच लक्ष नाही. आम्हाला जॉर्जला ऐकायचंय्. तुमची पिरपिर पुरे असंच साऱ्यांना वाटतंय, मग जॉर्ज उभा राहतो. सुरुवात गंभीरपणे आणि हलक्या सुरात करतो, पान रंगावं तसं त्याचं भाषण हळूहळू रंगू लागतं. एखाद्या डफासारखा तो कडाडू लागतो. तरवारीसारखे सपासप वार करतो. हात उंचावून त्वेशाने बोलतो. आवेशाने सारे सभागृह दणाणून टाकतो. सर्व उमेदवारांची वक्तृत्वस्पर्धा लावली तर जॉर्ज हमखास पहिला येईल असं वाटतं. मध्यावधी निवडणूका घेण्यामागचा हेतू काय असावा याबद्दल तो विचार मांडतो, जॉर्ज तू चार वर्षं कुठं होतास ? असं विचारणाऱ्यांना प्रत्युत्तर देतो. मी तुरुंगात होतो तेव्हा तुम्ही कुठं होतात ? असा प्रतिसवाल विचारून तो त्यांना गारद करतो. तास-दीडतास बोलून जॉर्ज फड जिंकतो.

दक्षिण मुंबईवर ढिली झालेली आपली पकड सावरण्यास जॉर्जनं आरंभ केला तो त्याच सभेपासून. आधीपासूनच त्याने प्रचाराचे मोर्चे बांधले. स. का. पाटील सिंडिकेटच्या गुहेतून आरोळ्या ठोकीत असतानाच जॉर्जनं स्वतःची उमेदवारी जाहीरही करून टाकली. तरी पाटलांच्या आरोळ्या थांबेनात. मी दक्षिण मुंबईतूनच उभा राहणार असं ते गर्जतच राहिले. पण हे गर्जणं तसंच राहिलं (गर्जेल तो पडेल काय? (पडेल म्हणजे निवडणूकीत नव्हे!)–हेच खरं!) पाटील बनासकाठ्याला गेले. जॉर्ज दक्षिण मुंबईतच राहिला. 'ही ईज् बेस्ट अमंग द लॉट' असं सर्व उमेदवारांच्या संदर्भात लोक जॉर्जबद्दल बोलू लागले. आता जॉर्ज येणार असं ठामपणाने बोललं जाऊ लागले. रॅम्पार्ट रोला ड्रॉईंगरुमच्या वरती पोट माळ्यावर जॉर्जनं आपलं निवडणूक कार्यालय थाटलं. फोन आला, कार्यकर्ते जमले. 'तुम्ही कोणाबरोबर? बद्रीप्रसाद की, इंदिरा गांधीबरोबर?' असा सवाल करणारे, सर्वत्र औत्सुक्य वाढीला लावणारं पोस्टरही झळकले. जॉर्जच्या सभेची संख्या वाढू लागली. रोटरी क्लबपासून ते झोपडपट्टी संघापर्यंत जॉर्ज चौफेर मुलूख मैदान तोफ डागू लागला. उमेदवारीचा अर्ज भरून झाला. दक्षिण मुंबईतून सर्वात जास्त अर्ज भरले जात होते. आणि शेवटच्या दिवशी अर्ज भरण्याची मुदत संपण्याआधी 'नवल' वर्तले! नवल टाटांनी अर्ज भरला. दक्षिण मुंबईच्या मतदारसंघाच्या ललाटी काही वेगळंच लिहून ठेवलेलं होतं. भारताचे अग्रेसर उद्योगपती नवल टाटा खुद्द रणांगणात उतरले, दक्षिण मुंबईतल्या निवडणुकीला वेगळेच वळण लागले, आता खरी फाईट फर्नांडीस आणि टाटा मध्येच होणार असं सारे म्हणू लागले व या घटकेला तेच खरं आहे. नवकांग्रेसचे उमेदवार डॉ. कैलास. त्यांचा एक नेता तर लागलीच म्हणाला म्हणे 'नाऊ वुई हॅव लॉस्ट द सीट!' डॉ. कैलास यांनीही खाजगीत आपल्याला विशेष आशा वाटत नसल्याचे सांगितले आहे असं म्हणतात.

जॉर्जनं आपलं सारं लक्ष केंद्रित केलंय टाटांवर. टाटाका नोट लो, जॉर्जको वोट दो अशी घोषणा द्यावी लागणार की काय असं तो कार्यकर्त्यांत बोलतो. सध्या अहोरात्र त्याला निवडणुकीनंच पछाडलय्. या निवडणूकीच्या काळात त्याचा मुक्काम आहे, भुलाभाई देसाई रोडवरील आपल्या श्री. भानू नावाच्या मित्राकडे. त्याची मुलाखत मी तेथेच घेतली. भल्या पहाटे त्यानं मला बोलावलं. घरी त्याचा पेहराव अगदी वेगळा होता. निळ्या रंगाचा गुरु शर्ट त्यानं घातला होता आणि पटेरी पटेरी लुंगी नेसली होती. लुंगी त्याला खूप आवडते असं त्यानंच कुलाबा विकास महिला मंडळाच्या बैठकीत सांगितलं. अनेक लुंग्या त्यानं जमवल्यात, पण तो पडला पुढारी. त्यामुळं आपला पांढरा, लांब बाह्याचा बुशशर्ट आणि कुठल्यातरी विशेष भडक नसलेल्या रंगाची पँट हा आपला पेटंट पुढाऱ्याचा पोशाख करूनच त्याला समाजात वावरावं लागतं. लुंगी नेसण्याची आपली हौस तो घरीच

मागवून घेत असावा, तो कोचावर बसला. दोन्ही हातानं त्यानं डोकं गच्च धरलं आणि मग तो बोलत राहिला. भडाभडा सांगू लागला. एखादा निष्णात राजकारणी जशी सावधपणे मुलाखत देतो तस सावधपणे पण चटचट तो बोलू लागला.

'नवल टाटांच्या आगमनानं या निवडणुकीस जो खरा अर्थ यायला हवा होता तो आता आला आहे. शेवटी निवडणूक म्हणजे प्रत्येक नागरिकाने आपले व देशाचे भवितव्य ठरविण्याची एक संधी असते. टाटांनी मतदारांसमोर स्पष्ट पर्याय उपस्थित केला आहे. भारताच्या उद्योगपतींची बाजू जशी लोकसभेत मांडायला हवी तशी ती मांडली जात नाही आणि उद्योगपतींवर लोकसभेत जे आरोप केले जातात त्याची सफाई त्या ठिकाणी होत नाही म्हणून आपल्याला लोकसभेत जायचंय् असं टाटांनी आपली उमेदवारी जाहीर करताना सांगितलंय्.' अशा धीम्या सुरात जॉर्ज मुलाखतीला आरंभ करतो. त्याचा बोलण्याचा वेग मी लेखणीत पकडू शकत नाही. हे त्याच्या ध्यानात येतं. ही सभा नाही हे त्याला आठवतं. मग तो सावकाश बोलतो. –दक्षिण मुंबईत दहा लाख लोक राहतात. त्यापैकी सात लाख लोकांची राह्यची व्यवस्था नाही. हजारो लोक झोपडपट्टीत आणि लक्षावधी लोक जुन्या मोडक्या चाळीत राहतात. दक्षिण मुंबईच्या फूटपाथवर जेवढी माणसं झोपतात तेवढी मुंबई शहरातील दुसऱ्या कोणत्याही भागात झोपत नसावीत. एका बाजूला खूप पैसा व श्रीमंती आहे आणि दुसऱ्या बाजूला त्याच्याच छायेखाली खूप गरिबी. असं दक्षिण मुंबईचं चित्र आहे. मरीन ड्राइव्ह याच क्षेत्रात आहे. कफ परेड, नरीमन पॉइंटभोवती नुकत्याच उभ्या राहिलेल्या पंचवीस मजली इमारती याच क्षत्रात आहेत, धोबीवाडी, धसवाडी येथील मोडकळीस आलेल्या चाळी पाहून तेथे राहणाऱ्यांना बेघर करणार आहेत. त्या चाळीही याच क्षेत्रात आहेत. जेथे हजारो लोक राहतात व ज्यांना कोटल्याही नागरी सुखसोयी मिळत नाहीत अशा सुंदर नगरी आणि गीतानगरी झोपडपट्टया याच भागात आहेत, दहा बाय दहा खोलीत दोन–दोन, तीन–तीन कुटुंबे राहत असलेले दृश्य दिसते याच दक्षिण मुंबईत. मरीन ड्राईव्ह, कफ परेड भागातल्या इमारतींना चोवीस-चोवीस तास पाणी मिळते तर केवळ अर्धा ते एक तास पाणी आणि तेही खालच्या मजल्यावर मिळणाऱ्या हजारो इमारती आमच्याच दक्षिण मुंबईत आहेत, गिरगावातला मराठी तरुण, काळबा देवीला राहणारा गुजराती तरुण, भेंडी बाजारातला मुस्लीम तरुण नोकरीच्या शोधात हिंडत असतो आणि जीवनात कोटल्याही प्रकारची आशा बाळगणे त्याला कठीण होऊन बसलेलं आहे.'

दक्षिण मुंबईचं असं मोठं मर्मभेदक चित्र जॉर्ज उभं करतो आणि मग तावातावाने म्हणतो, 'अशा या गरीब जनतेची मते मागून उद्योगपतींची भूमिका मांडण्यासाठी मला लोकसभेत पाठवा असं म्हणणारे नवल टाटा आहेत. अर्थात् त्यांच्या या भूमिकेबद्दल मला काही आश्चर्य वाटत नाही. भारतातलं सर्वात मोठं

उद्योगपतींचं घराणं म्हणजे हे टाटा घराणं. ज्या चाळीस एक कुटुंबांच्या हातात भारताची जवळजवळ सर्वच आर्थिक शक्ती केंद्रित झाली आहे त्यांच्यात टाटा घराणं सर्वात प्रमुख व मोठं आहे. उद्योगपतींच्या समस्यांशिवाय सामान्य माणसांचे प्रश्न या लोकांच्या नजरेसमोर कधी येऊ शकतील अशी अपेक्षा बाळगणंच चूक आहे.'

मग जॉर्ज एक सवाल टाकतो–टाटांना तो म्हणतो-'एक प्रश्न आहे, ज्याचं उत्तर टाटांनी देणं आवश्यक आहे असं मला वाटतं. १९५२ पासून ते आजतागायत काँग्रेस पक्षाला टाटा घराण्याने किती पैसा दिला आहे याचा खुलासा व्हायला हवा. उद्योगपती व भांडवलदार यांच्या पैशावरच काँग्रेस पक्ष आपले राजकारण करीत आहे याचा पुनरुच्चार करण्याची काही गरज नाही. स्वतंत्र पक्ष उघड उघड राजे, महाराजे आणि उद्योगपती यांचा पाठपुरावा करीत असला तरी स्वतंत्र पक्षाला जेवढे पैसे धनिक लोकांकडून मिळत असतात त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक पैसे याच वर्गाच्या लोकांकडून काँग्रेस पक्षाला मिळत असतात ही वस्तुस्थिती आहे. गेल्या वीस वर्षांत माझा तरी असा अंदाज आहे की टाटा घराण्यापासून काही कोट रुपये काँग्रेस पक्षाला मिळाले असावेत, त्याचे कारण पण आहे. १९४७ साली टाटा घराणं पंचवीस कोट रुपयांच्या उद्योगधंद्यावर आपला ताबा ठेवून होतं, आता हे घराणं म्हणजे सातशे कोट रुपयांचं (मिठापूर प्रकरण जमेस धरून) साम्राज्य होऊन बसलं आहे. या गेल्या तेवीस वर्षांत देशातील उद्योगपतीत टाटांनी आपले पहिले स्थान आजपर्यंत टिकवून ठेवलं आहे. बिर्ला अजून नंबर दोनवरच आहेत. तेव्हा उद्योगपतींची बाजू लोकसभेत मांडायची म्हणजे यांना करायचंय् तरी काय? आमच्यासारखी माणसं उद्योगपतींकडून होणारा काळाबाजार, परवान्यांची विक्री, इन्कमटॅक्सची चोरी, कामगारांची सतवणूक, तस्कर व्यापार, अधिकारी लोकांना व राज्यकर्त्यांना लाचलुचपत देणे, किंमती वाढविणे या सगळ्या चोऱ्या, लांड्या-लबाड्या वेशीवर टांगण्याचं जे काम करीत आहेत ते न होऊ देणं हाच त्याचा अर्थ आहे काय? कारण इतर सर्वच बाबतीत उद्योगपतींची बाजू मांडण्याचं काम काँग्रेस पक्ष फारच मजबुतीने गेली तेवीस वर्षं करीत आलेलाच आहे! पण जसं मी आरंभीच म्हणालो, टाटांच्या या निवडणूक रणांगणातील आगमनानं एक चांगली गोष्ट घडली व ती म्हणजे श्रीमंत आणि गरीब, मालक आणि कामगार, शोषक आणि शोषित यांचा सरळ सामना आता उभा ठाकला आहे.'

त्यानंतर काहीसं व्यंगानं, टाटांचं महत्त्व कमी लेखावं म्हणून असेल जॉर्ज सांगतो, 'परवा खेतवाडीत टाटांची सभा झाली. तेथे जमलेल्या ३५० (!) लोकांना मी तुम्हाला कुठलंही आश्वासन देत नाही, पाण्याबद्दलही काहीही आश्वासन देत नाही असं ते म्हणाले. जमलेल्या लोकांनी म्हणे टाळ्या वाजवल्या!' मग जॉर्ज एकदम सिरियस होऊन म्हणतो, 'मला हे नेहमीच वाटत आलं आहे की, हिंदुस्थानातल्या

गरीबातळा सर्वात मोठा दुश्मन गरीब हा स्वतःच आहे. टाटांना आश्वासन द्यायची गरज तरी कसली ? मुंबईतल्या जनतेच्या घराच्या प्रश्नांवर, वाढत्या किंमतीवर, पाण्याच्या बेकारीच्या प्रश्नावर, तरुणात निर्माण झालेल्या वैफल्याच्या प्रश्नावर टाटांना काय म्हणायचंय ? काँग्रेस पक्षाला पैसे चारून, आपलं घराणं मोठं करून या समस्यांचे जनक त्यांच्यासारखेच उद्योगपती आहेत.'

सीमा प्रश्नाबाबत आपली व आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट करून जॉर्ज म्हणतो, 'सीमा प्रश्नावर टाटांना काही आश्वासन द्यायचं नाहीय. देणार तरी कसे ? १९४७ पासून उभ्या आयुष्यात टाटांनी मुंबई शहराचं निराळं राज्य असलं पाहिजे, संयुक्त महाराष्ट्राशी मुंबई जोडता कामा नये म्हणून जेवढे प्रयत्न करता येण्यासारखे होते तेवढे सर्व प्रयत्न मुंबईच्या उद्योगपतींबरोबर व त्यांचे पाठीराखे स. का. पाटील यांच्याबरोबर टाटांनी केले आहेत आणि माझ्या मनात काहीही शंका नाही की अजून जर कोठे संधी मिळाली तर नवल. टाटा याच भूमिकेवर परत आपला आवाज उठवण्याचा प्रयत्न करीत राहतील.'

टाटांचा असा समाचार घेतल्यावर जॉर्ज आपले दुसरे प्रतिस्पर्धी डॉ. कैलास यांच्याबाबत बोलू लागतो. तो म्हणतो, 'डॉ. कैलास हे काय म्हणून मैदानात आहेत हे मला अजून कळेनासे झाले आहे. तसं पाहिलं तर ते स. का. पाटलांचे खास मित्र आहेत. स. का. पाटील आरोग्यधाम नावाची पाटलांच्या नावे त्यांनी एक संस्था उभी केली असून ती ते अजून चालवित आहेत. कैलास सेवा सदन नावाची स्वतःच्या नावाची एक संस्थाही ते चालवित असतात. टेलिफोन डिरेक्टरीत पाहिलं तर या दोन्ही संस्थांचे फोन नंबर्स एकच असल्याचे तुम्हाला आढळून येईल. तेव्हा डॉ. कैलास हे आहेत पाटलांचे गृहस्थ. १९६६ साली जेव्हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी म्हणजेच बेळगाव, कारवार, निपाणीसाठी आम्ही सचिवालयासमोर घेराव केला होता तेव्हा त्याच्या निषेधार्थ मंत्रीमंडळातून राजीनामा देऊन बाहेर पडणारे हेच ते डॉ. कैलास ! १९५६–५७ साली जेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा लढा खरोखरच जीवन–मरणाचा लढा म्हणून आम्ही लढत होतो तेव्हा मराठी माणसांबद्दल हीन प्रकारचे उद्गार काढणारे हेच ते डॉक्टर कैलास ! मराठी माणूस भांडी घासायच्या लायकीचा आहे असं बोलण्याइतकी त्यांची मजल गेली होती. आयुष्यभर पाटील यांच्या हा मध्ये हा मिळवणं एवढंच डॉ. कैलास यांचं राजकारण आहे. सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी यांनी आतापर्यंत कुठं काय केलं आहे आणि यापुढे करणार तरी काय ?'

आपल्याविरुद्ध कशी मोहीम चालू आहे हे सांगताना जॉर्ज म्हणाला, 'तेव्हा हे असे दोघे उमेदवार–ज्यांनी आपल्या जीवनात जनतेच्या कुठल्याही प्रश्नाला वाचा फोडली नाही, ज्यांनी जनतेची कुठलीही चळवळ चालवण्यास मदत केली नाही आणि ज्यांची गेली तेवीस वर्षे आपापलं संस्थान वाढविण्याच्या कामात गेली. हो

माणसं आज मला पाडून आपल्यापैकी कोणाला तरी निवडून द्या या प्रचारात लागली आहे. तसं पाहिलं तर जॉर्ज फर्नांडिसला पाडण्याची मोहीम १९६७ साली' ज्या दिवशी द. मुंबईतील जनतेने स. का. पाटील यांना पाडलं त्याच वेळी जारी झाली. तीस हजार मतांचं बहुमत दक्षिण मुंबईच्या जनतेनं मला दिलं, आपला कौल अगदी स्पष्टपणे जाहीर केला. पण स. का. पाटलांना हे मान्य कुठं? प्रथम मुंबईच्या हायकोर्टात त्यांनी मला खेचलं. माझ्याविरुद्ध एक वर्ष दावा चालवला. दिवसाला कोर्ट, रात्री वकीलांचे घर आणि सकाळी वकिलांची कचेरी यात मला वर्षभर गुंतवलं. एक लाख रुपये खर्च करावा लागला. पाटलांविरुद्ध निकाल लागला. त्यांनी आणि ज्यांच्या नावे त्यांनी दावा दाखल केला होता त्यांचे एक नातेवाईक या दोघांनी चाळीस हजार रुपये खर्चापोटी द्यावेत असा निकाल कोर्टाने दिला. त्याला तीन वर्षे होऊन गेली. पण अजून पुष्कळशी रक्कम पाटलांनी कोर्टात भरलेली नाही. मी तर वकिलांना अजून पैसे द्यायचेत. आयुष्यात कधीही कर्जबाजारी न झालेला मी आज दक्षिण मुंबईच्या जनतेने दिलेला कौल खरा होता हे सिद्ध करण्यासाठी डोक्यावर हजारो रुपयांचं कर्ज घेऊन हिंडत आहे. मुंबई हायकोर्टात हा दावा फेटाळल्यावरसुद्धा मला सतावण्याची पाटलांची तहान भागली नाही तर सुप्रीम कोर्टात त्यांनी दावा दाखल केला आणि परत एक वर्ष त्यांनी मला कोर्ट-कचेरी करण्यात गुंतवून ठेवलं. सुप्रिम कोर्टाचा खर्च चाळीस हजाराहून अधिक झाला. खर्चापोटी मला सोळा हजार रुपये पाटील यांनी द्यावेत असा सुप्रिम कोर्टाने हुकूम केला. त्याला आता दोन वर्षे झाली पण पाटलांनी त्या रकमेपैकी एक पैसुद्धा अजून कोर्टात जमा केलेली नाही. मी मात्र आणखीच कर्जात बुडून गेलो. दोन वर्षे अशाप्रकारे आर्थिक, शारीरिक व मानसिकदृष्ट्या मला सतावण्याचा प्रकार या तथाकथित मुरब्बी पुढाऱ्यांनी केला. या मागचा उद्देश एकच होता की ज्या जनतेनं मला निवडून दिलं त्यांची कामं करण्यापासून मला दुसरीकडे अडकवून ठेवणं, मला निष्कारण बदनाम करणं, मला कर्जात बुडवणं व येन केन प्रकारेण मला सतावणं. एका बाजने हे सतावणं चालू असताना दुसऱ्या बाजूने माझ्याविरुद्ध प्रचार मोहीम चालूच राहिली. मुंबई महानगरपालिका यांच्या हातात. महाराष्ट्र शासन यांचे आणि केंद्र सरकारही यांचेच तरी मला मात्र सांगतात–'पाणी घेऊन ये!' मुंबईला जे पाणी मिळतं त्याचं समान वाटप करावं अशी माझी मागणी होती, आहे आणि यापुढेही राहणार आहे. श्रीमंतांना अधिक व गरीबांना कमी ही जी व्यवस्था आहे ती हाणून पाडली पाहिजे, त्यासाठी जनतेने उग्र लढा दिला पाहिजे. मी या प्रश्नावर लढू शकतो. जसे बेकारीच्या, महागाईच्या, जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईविरुद्ध हॉस्पिटल व शाळांमधील गैरसोयींविरुद्ध मी आवाज उठवू शकतो. मी जनजागृती निर्माण करू शकतो, मी मैदानात लढू शकतो. हेच मी जन्मभर करीत आलो आणि करीतही राहीन. पण हे प्रश्न सोडविणे हे सत्ताधाऱ्यांचे काम आहे.

आणि जरी सत्ता त्यांच्या हातात असली तरी त्याचा वापर त्यांना श्रीमंतांसाठी करायचा आहे म्हणून मी उपस्थित केलेल्या या पाण्याच्या प्रश्नाची टिंगल करणे व त्यातून मलाच बदनाम करणे हा प्रकार या लोकांनी चालविला आणि सामान्य माणसांची पण कमाल आहे, जेथे जनतेची चळवळ उभारण्यात त्यांनी मला पाठिंबा दिला पाहिजे तेथे 'तू पाणी घेऊन ये, तू भाव कमी कर' असं मला सांगितलं जात आहे. मी निर्माण केलेल्या प्रश्नाची उत्तरं मीच दिली पाहिजेत असा आग्रह धरला जात आहे. मी जर आज सत्तेवर असतो तर हा आग्रह शंभर टक्के बरोबर असता. परंतु मी जर सत्तेवर असतो तर हा आग्रह धरण्याची परिस्थिती निर्माण झाली नसती कारण हे सर्व प्रश्न सुटण्यासारखे आहेत, १९६८ साली महापालिका आयुक्तांनी मला लेखी कळवलं की जर पंध्रा कोटी रुपये खर्च केले तर मुंबई शहरात समान तास पाणी वाटप करता येईल. पण श्रीमंतांना मिळणाऱ्या सुखसोयी कमी करायला हे सरकार व महापालिका तयार नाही. खापर मात्र माझ्या डोक्यावर फोडीत आहेत.

जसं मराठी व गुजराती लोकात पाणी, पाणी म्हणून मला बदनाम केलं तसं मुसलमानात वेगळाच पवित्रा घेण्यात आला आहे. मी मुस्लीम विरोधी आहे, इस्त्रायलचा मित्र आहे, उर्दू भाषेचा शत्रू आहे असे अगदी खोटे प्रश्न उपस्थित करून माझ्याविरूद्ध प्रचार चालविला आहे. मी मंगळूरमध्ये जन्माला आलो असूनसुद्धा दाक्षिणात्यात, कानडी भाषिकात, बेळगाव, कारवार मी महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न करीत आहे असं सांगितलं जातंय. अशा पद्धतीने गेली चार वर्षे एक प्रकारची फर्नांडीस द्वेषाची मोहीम सबंध दक्षिण मुंबईत पसरवण्याचं काम करण्यात आलं. या सगळ्या हालचालींमागे सर्वात मुख्य हात होता स. का. पाटलांचा आणि त्यांच्या मित्रांचा.'

'दक्षिण मुंबईतून आपण निवणूक लढवू नये म्हणून काय काय प्रयत्न झाले हे सांगताना फर्नांडिसला चेव आला. मी या मतदारसंघातून उभे राहू नये म्हणून दहा लाख रुपये देऊ करण्यात आले होते असे खळबळजनक विधान त्यांनी केले. 'तुम्हाला अॅप्रोच झाले होते लोक?' मी विचारलं. 'त्यांची काय हिंमत आहे. मला डायरेक्ट भेटायची? माझ्या कार्यकर्त्यांना त्याबाबत फोन आले होते!'— जॉर्ज.

तो पुढे म्हणतो, 'स्वतःला (पाटलांना) सुरक्षित निवडणूक क्षेत्र नाही. आणि मला म्हणे, इतरत्र जा, मीच पाटलांना ऑफर देऊ केली. — मी तुम्हाला अगदी अति सुरक्षित मतदारसंघ देतो. अपोलो १४ यानात बसून चंद्रावर जा. एकही मतदार नाही. एकदम बिनविरोध निवड!'

शिवसेनेच्यावतीने दोन उद्योगपतीही मला भेटले होते! असंही त्याने सांगितलं मोठ्या हिरीरीने आपली बाज ठामपणे मांडणारा हा जॉर्ज फर्नांडिस. सध्या

त्याच्या पायाला भिंगरी लागली आहे. सकाळपासून ते दुसऱ्या दिवशीच्या पहाटे-पर्यंत दक्षिण मुंबईत त्याची भ्रमंती चालू असते. टाटाच्या बड्या संस्थानाला त्याला टक्कर द्यायची आहे. टाटांनी एका नावाजलेल्या जाहिरात कंपनीकडेच आपली प्रचार यंत्रणा सुपूर्त केली आहे म्हणे! एकदम नजरेत भरतील अशी गर्द निळ्या रंगांची टाटांची पोस्टर्स जागोजाग झळकली आहेत. चित्रपटगृहातून त्यांच्या प्रचाराच्या रंगीत स्लाईड्स दाखविल्या जात आहेत. एखाद्या महापुरासारखा टाटांचा दिमाख फर्नांडिसपुढं नाचतो आहे. डोळे दिपवन टाकतो आहे. हलके हलके टाटांचा प्रभाव वाढतो आहे असं लोक बोलू लागले आहेत. जॉर्जला त्याच्याविरुद्ध झुंजायचं आहे. पैसा कमी पडणार आहे. याची जॉर्जला जाणीव आहे. एखाद्या मतदार असलेल्या शेटजीकडे जॉर्ज गेला तर तो म्हणतो, 'क्या अपने चेक नहीं दिया?' त्यावर तो शेठजी उत्तरतो, 'ये तो सब आपकाही है!' त्यावर जॉर्ज चटकन उत्तरतो. 'हे उत्तर तर टाटांसारखं झालं. टाटांचा उद्योगसमूहाचा पसारा सातशे कोटींचा आहे असं मी जेव्हा सांगतो तेव्हा टाटा म्हणतात – हे सारं तुमचंच आहे, जनतेचं आहे. तसंच उत्तर आहे हे तुमचं!' जॉर्जचं हे उत्तर एकून शेटजी हसतात मात्र बहुतेक वेळा चेक तसाच राहून जातो.

जॉर्ज भटकतो एका फियाट गाडीतून. तो टॅक्सीवाल्यांचा नेता. एका टॅक्सी-वाल्याने नवी फियाट गाडी टॅक्सीसाठी खरेदी केली. तिची टॅक्सी बनवण्यापूर्वी निवडणुकीपर्यंत ती गाडी त्याने जॉर्जला दिली आहे. पूर्वी जॉर्जकडे एक युनियनची शेवरलेट गाडी होती. ती 'बेस्ट'मधील एका माजी कामगाराला त्याने दिली. आता तिकडे उत्तर प्रदेशात टॅक्सी म्हणून ती गाडी वापरली जात आहे.

नवल टाटांबद्दल जॉर्ज इतका बोलतो पण टाटांनी मात्र अगदी पहिल्या पत्रकार परिषदेपासून ते आतापर्यंत जॉर्जच्या किंवा कोठल्याही उमेदवाराविरुद्ध अवाक्षरही काढलेलं नाही. उलट आपल्या प्रतिस्पर्ध्याची ते मुक्तकंठाने प्रशंसाच करतात. जॉर्जची व नवल टाटांची तशी जुनी जानपछान आहे. ताजमहाल हे अलिशान हॉटेल टाटांचंच, तेथल्या वेटरला १९६२ साली महिना १४ ते १६ रुपये पगार (जेवून खाऊन) मिळायचा, जॉर्ज त्यांच्या संघटनेचा नेता, त्यानं लढा लढवला आणि आता ताजमहाल येथल्या वेटरला दरमहा ४०० रुपये मिळतात! त्यावेळी पगारवाढीची बोलणी जॉर्जनं नवल टाटांबरोबर केली होती. तेव्हा या प्रतिस्पर्ध्यांची ओळख ही अशी जुनी आहे.

जॉर्ज हा सबंध मुंबईतला कामगारांचा एकेकाळी अनभिषिक्त सम्राट होता. १९५६ साली १३ जुलै रोजी त्याने महापालिका कामगारांचा संप घडवून आणला. त्यावेळी "पाणी बंद, मार्केट बंद, गार्डन बंद, झाडू बंद" अशा घोषणा होत्या. 'बंद' कल्पनेचा जन्म त्यावेळेपासून झाला. "मी बंदचा बाप आहे आणि महा-पालिका कामगार आहे" असं जॉर्ज म्हणतोच. पुढे मुंबई बंद झाली. महाराष्ट्र बंद

झाला आणि भारत बंद पर्यंत मजल गेली. असा हा बंद चा बादशहा १९६७ साली लोकसभेत निवडून गेला. पण तेव्हापासून गेली चार वर्षे तो मुंबईला परका झाला. येथल्या कामगारांवरही त्याची पकड ढिली झाली आहे अशा प्रकारचं फीलींग सर्वत्र आलं. जॉर्ज तू कुठं होतास ही भावना सर्वांच्या मनात घर करून राहिली. जनतेतील या भावनेची कोंडी फोडून जॉर्जला यश मिळवायचं आहे. या मतदार-संघात कोण यश मिळविल हे छातीठोकपणे सांगणं कोणालाही शक्य नाही. सामना अटीतटीचा होणार यात शंका नाही.

२१ वर्षापूर्वी, ११ जुलै १९५० रोजी जॉर्ज दक्षिणेतून मुंबईस आला. हॉर्निमन सर्कलजवळील देना बँकेबाहेरच्या फूटपाथवर तो झोपला. तेथेच तो राहत असे. म्हणजे आयुष्यात मुंबईत तो प्रथम आला नि योगायोगाची गोष्ट म्हणजे दक्षिण मुंबईतल्या एका फूटपाथने त्याला आसरा दिला. आता एकवीस वर्षांनी याच भागातली जनता त्याला आश्रय देईल की नाही हे पाह्यचे.

## चित्रपट गाढव बनवतात– जॉर्ज

जॉर्जला पुस्तकें वाचायला खूप आवडतात. ‘एअरपोर्ट’वाला आर्थर हेलेची सगळी पुस्तकं त्यानं वाचून काढली आहेत. अलिकडे अमेरिकेत अत्यंत लोकप्रिय झालेलं एरिक सेगलचं ‘लव्ह स्टोरी’ ही त्यानं वाचलं. “बहुत अर्सेके बाद रोना आया” असे हे पुस्तक वाचल्यावर त्यानं सांगितलं.

पिक्चर वगैरे पाहता का? असं विचारलं तर तो म्हणाला, “नाही वर्षातून एखादवेळेस मित्रानं ओढून नेलं तर जातो. परंतु बहुतेक वेळ मी चक्क पेंगत असतो. हे चित्रपटवाले प्रेक्षकांना गाढव बनवत असतात आणि आपल्याला कोणी गाढव बनवलेलं खपत नाही!”

– माणूस प्रतिनिधी

चरणसिंगांचे डोळे
धूर्त व कठोर मुत्सद्याचे
दर्शन घडवितात.

## चरणसिंग बड्या आघाडीत का नाहीत ?

दिल्लीचे स्थिर सरकार
अस्थिर करू शकणाऱ्या
निर्णायक शक्तीची
वास्तव ओळख

## चरणसिंग : राष्ट्रपती का उपपंतप्रधान !

माणूस
बुधवार ३ मार्च १९७१
या पुढील अंकी



आमदार कारखानीस



दाजीबा देसाई

मुरब्बी डावे नेतृत्व

## तुफान चुरशीने लढल्या जात असलेल्या कोल्हापूर - हातकणंगले मतदारसंघातील निवडणुका

कोल्हापूरच्या राजकारणाची खेळी काही वेगळीच आहे. विशिष्ट जातीय पार्श्वभूमी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वत्र आघाडीवर असलेल्या नवकाँग्रेसला खुद्द कोल्हापुरात होणारा प्रखर विरोध आणि त्यावर स्थानिक राजकारणाची झालर, यामुळे येथील राजकीय आघाडीला एक वेगळेच स्वरूप प्राप्त झाले आहे.

मुदतपूर्व निवडणुकीच्या संदर्भात विचार करायचा झाला तरी खुद्द शहरामध्ये व जिल्ह्यातही असलेली शे. का. पक्षाची ताकद, स्थानिक काँग्रेसमधील गटबाजी, राजघराण्यासंबंधी सर्वसाधारण जनतेत असलेली आपुलकीची भावना–त्यातून



बाबासाहेब निंबाळकर



दत्ताजी कदम

नवकाँग्रेसची नवी निवड

## माणूस प्रतिनिधी
## शरद कृष्णन् यांजकडून

निर्माण झालेले दत्तक विधान प्रकरण, सहकारी क्षेत्रातून निर्माण झालेले संपन्न नेतृत्व आणि त्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षा आणि प्रदेश काँग्रेसचे राजकारण अशा विविध पदरांचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

शे. का. पक्ष हा या भागातील प्रमुख पक्ष. एक जमाना असा होता, की कोल्हापुरात काँग्रेसवाल्यांना सभा घेणे, मिरवणुका काढणे आणि टोपी घालून फिरणे कठीण होते. स्थानिक वर्चस्वामुळे नगरपालिका अर्थातच शे. का. पक्षाकडे होती. स्थानिक पातळीवर सत्ता राबविण्याच्या मिळालेल्या या संधीचा शे. का. पक्षाला

फायदा मात्र मिळू शकला नाही. देशामध्ये कॉंग्रेस ज्या कारणामुळे बदनाम झाली, ते भ्रष्टाचार आणि वशिलेबाजीचे वारे शे. का. प.च्या अंगात संचारले आणि हळू-हळू पक्षाची लोकप्रियता कमी होऊन जनमानसावरील त्याची पकड कमी होऊ लागली. स्थानिक नेतृत्व ज्यावेळी कॉंग्रेसच्या भ्रष्टाचाराला नावे ठेवत, त्यावेळी उपस्थितांमध्ये उपहासाची भावना दिसून येई. साधारणपणे १९५७ पर्यंत शे. का. पक्षाचे नगरपालिकेतील वर्चस्व टिकून होते. १९५७ ते ६२ या काळामध्ये झालेल्या फाटाफुटीचा फायदा मिळून श्रीपादराव बोंद्रे आणि श्री. पवार यांनी नगर-पालिकेचे अध्यक्षपद भूषविले. ६२–६७ मध्येही द. रा. बगाडे व पोपटराव जगदाळे या कॉंग्रेसवाल्यांना ही संधी मिळाली. ६७ साली नगरपालिकेच्या ज्या निवडणुका झाल्या त्यामध्ये शे. का. पक्षाचे फक्त ११–१२ लोक निवडून येऊ शकले. कॉंग्रेस-वाले व कॉंग्रेसप्रेमी मंडळींनी आघाडी निर्माण करून निवडणुका लढविल्या. या गटाची ताकद बऱ्यापैकी असून सुमारे २५ सदस्य या गटामध्ये आहेत. तात्यासाहेब पाटणे (अपक्ष) हे सध्या नगरपालिकेचे अध्यक्ष आहेत. एस्. एस्. पी. चे ३ सभासद होते. त्यातील धोंडीराम रेडेकर हे सधन शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य शे. का. पक्षाला मिळाले. त्याची प्रतिक्रिया होऊन शे. का. पक्षातील बापूसाहेब खानविलकर व आत्माराम मोहिते फुटून निघाले. राष्ट्रीय पातळीवर सुरू झालेली ही पक्षभेदाची लागण, या स्थानिक पातळीवरही इतकी छान रुजली आहे की कोण केव्हा पलटी मारेल, याचा नेम राहिलेला नाही. लोकसभेचे कोल्हापुरातील आघाडीचे उमेदवार श्री. बापूसाहेब पाटील (संसोपा) यांच्याशी मी या विषयावर बोलत असता ते म्हणाले : मी आपल्याला ही माहिती देतो आहे, या काळातही परिस्थिती बदलली असल्यास मला आश्चर्य वाटणार नाही. इतकी ही पक्ष बदलाची बाब नाजूक आहे. विधान परिषदेवर स्थानिक स्वराज्य संस्थांना जे प्रतिनिधित्व असते त्याच्या निवडणुका गेल्या वर्षी झाल्या. विरोधी पक्षांतर्फे एक उमेदवार निवडला जाता तर यश जरूर मिळते. अविनाश अडके यांची उमेदवारी कम्यु-निस्टांनी व पी. एस्. पी.ने पुरस्कृत केली. शे. का. पक्षाने सं. सो. पा.मधून फुटलेल्या धोंडीराम रेडेकर यांना फुटीचे–पारितोषिक म्हणून या जागेसाठी उमेदवारी दिली आणि या लठ्ठालठ्ठीमध्ये कॉंग्रेसचे सदाशिवराव शिंदे विजयी झाले. आणि फुटीरांना उत्तेजन दिल्यामुळे नाराज झालेले शे. का. पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते, माजी आमदार दिनकरराव नलावडे यांनी पक्ष सोडला. या जागेसाठी ते इच्छुक होते. सर्वसाधारण परिस्थिती व जनमत कॉंग्रेसला प्रतिकूल, तरी अनेक निवडणुकीं-मध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कॉंग्रेसला जे यश मिळते, त्यामागे डाव्यातील ही लठ्ठालठ्ठी दडलेली आढळते. डाव्या पक्षांना भरपूर काम करता येईल अशी परिस्थिती जिल्ह्यात आहे. डाव्यांमध्ये सर्वांत प्रबळ पक्ष शे. का. प., त्याखेरीज सं. सो. पा., कम्युनिस्ट, प्र. सो. पा. यांनाही वाव आहे. परंतु स्थानिक पातळीवर

शा पक्षांचे एकमेकांशी जमत नाही. आणि या मंडळींच्या हातात सत्ता असताना तरी काय झाले? शे. का. पक्षाचे नारायण जाधव अध्यक्षपदी असताना अपेक्षित किंमतीपेक्षा २३ टक्के जादा रक्कम ज्यांनी मागितली, अशा कंपनीचे टेंडर पास होऊन संभाजी पूल बांधला गेला. ७॥ लाख रुपये खर्ची पडूनही पुलाच्या परिसरात वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा न झाल्याने पुलाचा व्हावा तसा उपयोग होत नाही. या पक्षाची मंडळी सत्ताधारी असताना कित्येक वेळा एका कामासाठी मजूर झालेले पैसे दुसऱ्या कामासाठी वापरले गेले. नियोजित टिंबर मार्केटसाठी गंजीच्या माळावरील जी ३५–४० एकर जागा ताब्यात घेण्यात आली, त्यावरील खर्च हा पण वादाचा विषय आहे. वशिलेबाजीने व पैसे घेऊन नोकऱ्या दिल्या गेल्या. यासंबंधीचे आरोप तर आज जाहीर सभांमधून होत आहेत. देवल क्लबशेजारी शे. का. पक्ष स्वतःची सुमारे ७०–७५ हजार रुपयांची वास्तू बांधत आहे. या वास्तूसाठी वेगळा निधी मोठ्या प्रमाणावर उभारल्याचे ऐकिवात नाही. राज्य पातळीवर काम करणाऱ्या पक्षाच्या स्थानिक शाखेने या कामासाठी पैसा कसा गोळा केला यासंबंधी थोडीफार कुजबूज ऐकू येते. या सर्व परिस्थितीमुळे आणि आपल्या पक्षाचेच गाडे पुढे रेटण्याच्या हेतूने शे. का. पक्षाचे अन्य डाव्यांशी जमू शकत नाही. जिल्हा परिषदेची सूत्रेही याचमुळे विरोधी पक्षाच्या हातात रहात नाहीत. आज जिल्हा परिषदेमध्ये डाव्यांची ताकद फारच कमी आहे. नवकाँग्रेसचे दिनकरराव यादव सलग १० वर्षे परिषदेच्या अध्यक्षपदाची मिरासदारी बाळगून आहेत.

## काँग्रेसचे राजकारण

आपल्याला त्रास देईल, इतकी कुणाची ताकद वाढू द्यायची नाही, आणि विशिष्ट मर्यादेपलिकडे कोणाला पोचू द्यायचे नाही या प्रदेश काँग्रेसच्या धोरणामुळे येथील नेतृत्वाची वाढ झाली नाही. खुद्द कोल्हापूर शहर तर सतत विरोधामध्ये राहिल्यामुळे शासनाचा शहरावर रोष राहिला. परंतु कोल्हापूरने कधी फिकीर केली नाही आणि उत्तम काम करण्यासाठी प्रसिद्ध असलेले, मुद्देसुद, स्पष्ट बोलण्याच्या हातोटीमुळे निष्कलंक चारित्र्यामुळे प्रिय असलेले, धेकापशी एकनिष्ठ असलेले त्र्यं. सी. कारखानीस कोल्हापूर शहराने सतत विधान सभेवर पाठवले. साठीच्या घरात असलेले हे कारखानीस आज हातकणंगले मतदार संघातून लोकसभेसाठी उभे आहेत. कारखानीसांचे हे यश काँग्रेसच्या डोळ्यात सलत आहे. परंतु कोल्हापूर शहर जिंकणारा उमेदवार त्यांना अद्यापही मिळत नाही. शहर व जिल्हा काँग्रेसची सूत्रे आज ज्या मंडळींच्या हातात आहेत, ती मंडळी प्रदेश काँग्रेसच्या शब्दाबाहेर नाहीत. तथापि प्रदेश काँग्रेसशी संघर्ष करू शकेल अशी शक्ती मध्यंतरीच्या काळामध्ये रत्नाप्पा कुंभारांचे रूपाने निर्माण झाली. सहकारी क्षेत्रातील दांडगे कर्तृत्व, त्यातून निर्माण झालेली आर्थिक व संघटनात्मक शक्ती यामुळे

रत्नाप्पा ही जिल्ह्यातील मोठी ताकद होऊन बसली. त्यातही जिल्ह्यामध्ये आढळणारे काँग्रेस विरोधी वातावरण व शेकापची ताकद यामुळे काँग्रेसांतर्गत परिस्थितीचा विचार करताना रत्नाप्पांचे व्यक्तीगत महत्व विशेष मोलाचे ठरते. रत्नाप्पांचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे ते केवळ सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते नाहीत. राजकीय क्षेत्रामध्येही त्यांच्या महत्त्वाकांक्षा आहेत. (किंवा आता होत्या म्हणा फार तर) स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये संस्थानांमध्ये माधवराव बागलांनी जे प्रजा परिषदेचे काम केले. त्यात रत्नाप्पांचा वाटा होता. स्वातंत्र्योत्तर काळातील सहकार क्षेत्रातील यशस्वी कामगिरीमुळे त्यांच्या राजकीय महत्वाकांक्षा प्रज्वलीत होणे स्वाभाविक होते. तथापि रत्नाप्पांचे निर्विवाद नेतृत्व जिल्ह्यामध्ये प्रस्थापित होणे प्रदेश काँग्रेसला मानवणारे नव्हते. म्हणून विविध आघाड्यांवर त्यांना विरोध करण्यात आला. आज हातकणंगले मतदार संघातून शेकापच्या कारखानीसांविरुद्ध नवकाँग्रेसतर्फे उभे असलेले दत्ताजी कदम यांची उमेदवारी हा याच राजकारणाचा एक भाग. आज पन्नाशीच्या घरात असलेले दत्ताजी कदम हे सहकारी क्षेत्रातीलच. शैक्षणिक आघाडीवर ते मॅट्रिकची पायरी ओलांडू शकले नाहीत. सहकारी क्षेत्रात रत्नाप्पांना आव्हान देणारी शक्ती निर्माण झाली तर प्रदेश काँग्रसला हवी होती. दत्ताजी कदम यांच्यामध्ये ही ताकद आहे हे जाणून सहकारी क्षेत्रामध्ये त्यांचे नेतृत्व फुंकर घालून फुलवण्यात आले. आणि हा हा म्हणता दत्ताजी कदम या क्षेत्रामध्ये आघाडीवर येऊन बसले. सामान्य कामगार म्हणून वाटचाल सुरू करणारे दत्ताजी कदम आता निर्मिती अवस्थेत असलेल्या दत्त सहकारी कारखान्याचे अध्यक्ष आहेत. डेक्कन स्पिनिंग मिल, यशवंत को–ऑपरेटिव्ह प्रोसेस, लक्ष्मी प्रोसेस या लाखो रुपयांचा व्यवहार करणाऱ्या संस्थांवर त्यांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष वर्चस्व आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते संचालक आहेत. कोणाच्या केवळ आशिर्वादाने असे हे चौफेर यश मिळत नसते. त्यासाठी स्वतः जवळ महत्त्वाकांक्षा, जिद्द, माणसे जवळ करण्याची, त्यांना सांभाळण्याची ताकद असावी लागते. आणि नशिबाची जोड ही लागते. दत्ताजी कदम यांच्याजवळ हे सर्व गुण होते, प्रदेश काँग्रेसची सहानुभुती होती, आणि नशिबाची जोड होती. अशी चौफर साथ मिळाल्यामुळे दत्ताजी कदम एक मोठे प्रस्थ होऊन बसले. आर्थिक आणि संघटनात्मक ताकद त्यांनी निर्माण केली. राजकीय क्षेत्राचे दार उघडण्याचीच आवश्यकता होती. ते लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने उघडले गेले. या संदर्भात एक महत्त्वाची बाब नमूद केली पाहिजे. दत्ताजी कदमांना राजकीय पार्श्वभूमी नाही. राजकीय क्षेत्रामध्ये मोठी महत्त्वाकांक्षाही नाही. परंतु रत्नाप्पांना राजकीय आघाडीवर शह देण्यासाठी हे ' Non Political ' व्यक्तित्व प्रदेश काँग्रेसने राजकीय रिंगणामध्ये आणून उभे केलेले आहे. दत्ताजीनी आजपर्यंतएकही निवडणूक लढवली नाही. ही त्यांची पहिलीच निवडणूक हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. दत्ताजी कदम यांची उमेदवारी कशासाठी आहे हे रत्नाप्पा ओळखून

होते आणि त्याला शह देण्यासाठी काँग्रेसची आमदारकीची झूल अंगावर ठेऊनच त्यांनी काँग्रेस विरोधी आघाडी उघडली. त्यांचे साथीदार तर उघड उघड काँग्रेस॰ विरोधात जाऊन बसले आहेत व कारखानिसांचा प्रचार करीत आहेत. जिल्हा परिषदेसाठी रत्नाप्पा मंडळींचा वेगळा गट पडला आहे. काँग्रेस अंतर्गत संघर्षाचे आणखी कितीतरी पैलू आहेत. परंतु निवडणुकीच्या संदर्भात रत्नाप्पा गटाला शह देण्याचे जे राजकारण झाले त्यामुळे त्याची विस्ताराने दखल घेतली.

कोल्हापूरची लोकसभेची जागा. ही प्रदेश काँग्रेसचे दृष्टीने एक डोकेदुखीच आहे. ६७ साली या मतदार संघातून काँग्रेसचे शंकरराव माने शे. का. प. च्या डी. एस्. नार्वेकर यांच्याविरुद्ध सुमारे ४० हजार मतांनी विजयी झाले. आज त्यांची उमेद॰ वारी कायम ठेवली असती, तर आकाश कोसळले असते अशातला भाग नाही. तथापि बाबासाहेब निंबाळकरांची उमेदवारी मंजूर करून प्रदेश काँग्रेसने मोठी धूर्त पावले टाकली. बाळासाहेब देसाई यांचे नाव प्रारंभी या मतदार संघासाठी घेतले जात होते. ते मागे पडल्यावर खुद्द रत्नाप्पांना विचारणा करण्यात आली. कोल्हापुरातील उमेदवारी मान्य करून शंकरराव मानेंचा विरोध पत्करायचा, वाढत्या वयात लोकसभेचा लोभ धरला म्हणून सहकाऱ्यांची नाराजी पत्करायची हे धोके. उमेदवारी मान्य करण्यात रत्नाप्पांसमोर होते. प्रदेश काँग्रेसचे धोरण पाहून रत्नाप्पांनी उमेदवारी मान्य केली पण ते म्हणाले मान्यांविरुद्ध कोल्हापूरातून नको. दुसरा मतदार संघ द्या. नाव घेतले नाही तरी दुसरा म्हणजे अर्थातच हातकणंगले; तो मिळता तर दत्ताजींची चाल मंदावली असती. प्रदेश काँग्रेसचा डाव अशा प्रकारे उलटला गेला. आणि बाबासाहेबांची उमेदवारी पुढे आली.

बाबासाहेब निंबाळकर तरुण आहेत. राजकीय क्षेत्रात महत्त्वाकांक्षा असली तरी त्यांचे या क्षेत्रात काहीही काम नाही. मग पी. बी. साळुंके, सदाशिवराव मंडलीक, बाळासाहेब कौलवकर, डी. एस्. खांडेकर, ही अन्य शक्यता असलेली मंडळी बाजूला पडून एकदम बाबासाहेब निंबाळकरांचे नाव कसे पुढे आले ?

यशवंतराव चव्हाण यांनी कोल्हापूरचे गादीसंबधी १० वर्षापूर्वी जे उद्‌गार काढले होते, त्यामुळे छत्रपतींच्या घराण्यावर प्रेम करणारी जनता दुखावली गेली होती. त्यामुळे कोल्हापूरच्या परिसरामध्ये चौफेर हिंडूनही 'साहेब' कोल्हापुरात आले नाहीत. दत्तक प्रकरणावरून त्यावेळी जे वादळ निर्माण झाले, पद्माराजे सहाय्यक समिती स्थापन झाली. राजकीय आघाडीवरही या समितीचे अगदी आत्ता-आत्तापर्यंत वर्चस्व होते आणि या समितीच्या अग्रस्थानी होते—दादासाहेब निंबाळकर. दादासाहेब निंबाळकर हे काही अपवाद सोडले तर सर्व सामान्य सर्व संचारी व्यक्तिमत्व. कोल्हापूरातील प्रत्येक लहान मोठ्या संस्थेशी, तालमीशी, त्यांचा निकटचा संबंध. गावात सर्व साधारणपणे त्यांच्यासंबधी जिव्हाळा. राजघराण्यांशीही निंबाळकरांचे आपुलकीचे संबंध. अशा परिस्थितीत त्यांच्या चिरंजीवांना—बाबा॰

साहेब निंबाळकरांना लोकसभेत बसवले, तर कोल्हापूरच्या यशवंतरावविरोधी वातावरणातील तिखटपणा कमी होईल, दादासाहेबांच्या पुण्याईवर बाबासाहेब निवडून येण्याचीही शक्यता आहे म्हणून बाबासाहेबांना ऐनवेळी तिकीट देण्यात आले. हे तिकीट मिळविण्यामध्ये दादासाहेबांचा प्रत्यक्ष हात किती, हा वादाचा मुद्दा. परंतु आज दादासाहेब उघडपणे मुलाचा प्रचार करीत नाहीत. किंबहुना परिस्थिती त्यांना तसे करून देत नाही असे आढळून येते आहे. एकदम लोकसभेवर झेप घेऊ इच्छिणारे बाबासाहेब निंबाळकर, आणि दत्ताजी कदम. ही दोन्ही तशी राजकीय आघाडीवरील नवखी मंडळी. त्यांच्या उमेदवारीमागील राजकारण हे असे आहे. बाबासाहेबांचे बाबतीत तर ते परदेशहून आले आणि तिकीट दिले गेले असे झाले आहे. कात्यायनी पाणीपुरवठा योजनेचे ते चीफ प्रमोटर आहेत. या पाणीपुरवठा योजनेखाली वीरवाडी, नंदवाड, कंदळगाव, जैताळ, आदी १२ गावे येतात. निंबाळकर कुटुंबियांवरील विश्वासाने गावच्या मंडळींनी योजनेखाली जमा केलेली सुमारे ६२ हजार रुपयांची रक्कम बाबासाहेबांजवळ दिली. योजनेचे ४८० सदस्य असून, ही रक्कम, सोसायटी रजिस्टर्ड करून, सोसायटीचे नावे जमा करावी अशी त्यांची मागणी आहे. सर्व हिशेब ऑडिटर भागवत यांनी तपासले आहेत, व्यवहारात काही गडबड नाही, केवळ निवडणुकीच्या धामधुमीत चारित्र्यहननाचे हेतूने हा...डाव रचण्यात आला आहे, असा बाबासाहेबांचा खुलासा आहे. तो न पटल्याने संबधितांचे चक्री उपोषण कोल्हापूरचेच बिंदू चौकात चालू होते.

कोल्हापूर मतदार संघातून आघाडीतर्फे संसोपाचे बापूसाहेब पाटील उभे आहेत. संसोपा, जनसंघ, संघटना कांग्रेस, आदी आघाडी मंडळातील सहकाऱ्यांचा त्यांना पाठिंबा आहे. बापुसाहेबांचे वय ४८–४९. विद्यार्थी असल्यापासून ते राजकारणात रस घेत आहेत. शिक्षण बी. ए. एल्. एल्. बी.पर्यंत असून काही काळ त्यांनी वकिली केली आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक अप्पासाहेब फडके, यांचे ते जावई. व्यक्तिशः त्यांच्याबद्दल लोकमत चांगले आहे. पण स्थानिक पातळीवरील काही अपवाद सोडले, तर त्यांच्या पक्षाची ताकद मर्यादित. जनसंघ आणि संघटना कांग्रेसवाले त्यांचे जोडीदार हे तर जवळजवळ नगण्यच. शिवाय संसोपा आघाडीत सामील झाल्यामुळे डाव्या मंडळींचे वर्चस्व असलेला मतदार संघ त्यांच्यावर नाराजच. मी स्वतः बापुसाहेबांना भेटलो. अशा प्रतिकूल परिस्थितीतही ते चार–सहा वाहने आणि १५० कार्यकर्त्यांचा संच घेऊन प्रचार आघाडी लढवीत आहेत. छोटया छोटया सभांवर त्यांचा जास्त भर आहे. अर्थात आहे या परिस्थितीत त्यांच्या उमेदवारीचा गंभीरपणे विचार करता येत नाही. मात्र त्यांची उमेदवारी ही शेकापचे श्री. दाजीबा देसाई यांच्या दृष्टीने विचार करता 'न्युसन्स व्हॅल्यू 'ची ठरणारी आहे.

अपक्ष उमेदवारांपैकी के. एल्. मोरे कांग्रेसच्या तिकिटावर दोन वेळा खासदारकी

मिळूनही असंतुष्ट असल्याने अपक्ष म्हणून पुन्हा उभे आहेत. दुसरे अपक्ष आहेत. का. र. देसाई. हे दोघेही उभे आहेत इतकेच. कोल्हापुरातील खरी लढत नव-कांग्रेसचे बाबासाहेब निंबाळकर आणि शेकापचे दाजीबा देसाई या दोघांमध्येच आहे.

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

## कोल्हापूर जिल्हा

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लोकसभेच्या एकूण जागा दोन. एक कोल्हापूर-सावंतवाडी मतदार संघाची व दुसरी हातकणंगले मतदार संघाची. एकूण १२ तहशिल असलेल्या या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ३१८८,४ चौ. मैल असून १९६१च्या खानेसुमारे-प्रमाणे लोकसंख्या आहे १५ लक्ष १८ हजार ४००. जिल्ह्यामध्ये १२ ते १५० इंच पर्यंत पाऊस पडतो. २०,२१००० एकर भौगोलिक क्षेत्र असून त्यापैकी १०,४९००० एकर जमीन लागवडीखाली आहे. साखर कारखाने आणि सहकारी चळवळ, यामुळे जिल्ह्याच्या आर्थिक शक्तीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सात सहकारी साखर कारखाने सहकारी क्षेत्रात आहेत. सध्या ५ लहान मोठ्या पुलांची कामे चालू असून तुळशी प्रकल्पाची मोठी पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आली आहे. तुळशी प्रकल्पाची भिंत १४५ फूट उंच होणार असून, लांबी ३४६० फूट असेल. २४०० दशलक्ष घनफूट पाणी संचय त्यामुळे शक्य होणार असून २२ गावाची ७९१७ एकर जमीन पाण्याखाली येईल. योजनेचा खर्च २ कोटी रुपये आहे. निवडणूक वार्तापत्रा-मध्ये या किचकट आकडे-वारीचा धावता उल्लेख करण्याचे कारण एवढेच, की महाराष्ट्रातील इतर काही जिल्ह्यांच्या तुलनेने या जिल्ह्यातील जनतेला आर्थिक आघाडीवर जे थोडेफार स्थैर्य आहे, त्यामुळे निवडणुकीसारख्या महागड्या खेळाशी ती अधिक समरस होऊ शकते, हे वाचकांच्या लक्षात यावे-मुदतपूर्वी मतदार यादीमध्ये नाव नोंदवले जावे म्हणून १३० हजारावर लोकांनी अर्ज केले हे या जागृतीचेच एक लक्षण म्हणावे लागेल.

### कोल्हापूर मतदार संघ

या मतदार संघामध्ये खालील भागांचा समावेश होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| कोल्हापूर | शहर | मतदार | ८०,६३८ |
| करवीर | तालुका | " | ८८,३४६ |
| कागळ | " | " | ९१,५८८ |
| गडहिंग्लज | " | " | ८०,८२५ |
| चंदगड | " | " | ८०,८१६ |
| सावंतवाडी | " | " | ७२,८६६ |

एकूण मतदार ४, लक्ष, ९४ हजार ३७९ असून मतदान केंद्रे ७२७ आहेत. लढत वर सांगितल्याप्रमाणे बाबासाहेब निंबाळकर (नवकाँग्रेस) व दाजिबा देसाई (शेकाप) अशीच आहे.

शेकापचे दाजीबा देसाई राजकारणात मुरलेले, उत्तम वक्ते, आणि प्रादेशिक पातळीवर काम करणाऱ्या त्यांच्या पक्षाचे एक मोठे नेते. सीमा प्रश्नाबाबत त्यांचे कामही मोठे. शिवाय राज्य-सभेतील खासदारकी अनुभवली असल्याने लोकसभेत काम करणे त्यांना जड नाही. या उलट बाळासाहेब स्थानिक राजकारणात संपूर्ण नवे. दीर्घ काळ परदेशी वास्तव्य असल्याने जनतेशी संपर्क नाही. वक्तृत्व गुण नाही. अशी प्रथम दर्शनी विजोड वाटणारी ही झुंज प्रारंभी सांगितलेल्या पार्श्वभूमीमुळे चांगलीच रंगणार आहे.

लोकसभेच्या या जागेचे विधान सभेतील प्रतिनिधित्व सहा आमदार करतात. कारखानीस (कोल्हापूर शहर, शेकाप). व तुकाराम कोलेकर (गडहिंग्लज, शेकाप) शेकापचे फक्त हे दोन आमदार असून व्ही. के. चव्हाण (चंदगड). शिवरामराजे भोसले (सावंतवाडी) दौलतराव निकम (कागल) व श्रीपादराव बोंद्रे (करवीर)—हे सर्व आमदार नवकाँग्रेसचे आहेत आणि ही सर्व आमदार मंडळी आपआपल्या पक्षासाठी झटून काम करीत आहेत. कोल्हापूर शहराची परंपरा लक्षात घेतली, तर शहर मोठ्या प्रमाणात विरोधी मतदान करील मात्र विरोधी मतदानाचे हे प्रमाण शेकापची डागाळलेली प्रतिमा, आणि बाबासाहेबांची खोचक उमेदवारी यामुळे कमी होईल. सावंतवाडीला काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर मतदान अपेक्षित आहे. कागल, चंदगडी गडहिंग्लज आदि भागात दोन्ही पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. गडहिंग्लजला शेकापला चांगले मतदान अपेक्षित आहे. आघाडीची मते संसोपाचे बापुसाहेब पाटील घेतील. कम्युनिस्टांचे स्थानिक नेते गोविंद पानसे यांना भेटलो असता, शेकापच्या असहकारात्मक धोरणामुळे अद्यापी त्यांच्या पक्षाने कोणताच निर्णय घेतला नसल्याचे त्यांनी सांगितले. शेकापने अन्य पक्षांशी सल्लामसलत न करता दोन्ही जागा लढवण्याचा जो निर्णय घेतला, त्यामुळे विरोधी पक्ष त्यांच्यावर नाराज आहेत. कम्युनिस्ट नेते गोविंद पानसरे यांनीही प्रारंभी निवडणूक अर्ज भरला होता. परंतु प्रदेश नेतृत्वाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी माघार घेतली. अर्थात या पक्षाची ताकद हातकणंगले विभागाच्या राधानगरी विधान सभा मतदार संघाच्या गारगोटी भागामध्येच केंद्रित आहे. त्यामुळे कोल्हापूर मतदार संघाचे दृष्टीने त्यांचे महत्त्व कमी. सर्वसाधारण परिस्थितीत त्यांनी दाजिबांच्या बाजूने उभे रहावयास पाहिजे. परंतु सोलापूरला पकडलेली 'नॅशनल पॉलीसी'ची पट्टी त्यांनी इथेही पकडली तर मात्र ते निंबाळकरांचे बाजूने उभे राहतील. आणि या विरोधाची तीव्रता कितीही अल्प असली तरी शेकापच्या दाजीबांना तिची धग जाणवल्यावाचून राहणार नाही.

शहरामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया प्रमाणावर असून ते फार मोठया संख्येने बाबासाहेब निंबाळकरांचा प्रचार करताना दिसतात. इंदिराबाईंनी काही धाडसी पावले टाकून पक्षाची प्रतिमा जी काहीशी उजळली, त्यामुळे जो भावना-प्रधान विद्यार्थीवर्ग बाईंच्या राजकारणावर खूष झाला, त्या गटातील ही मंडळी आहेत म्हणजेच बदलत्या राष्ट्रीय परिस्थितीचा स्थानिक पातळीवर होणारा लाभ, असे या विद्यार्थी पाठिंब्याकडे पहावे लागेल. व्यक्तिगत उमेदवार पाहायचे तर दाजीबा सरस आहेत, हे एखादे नवखे पोरही सांगू शकेल. दाजीबांची उमेदवारी ही शेकापची जमेची बाजू ठरेल. तथापि केवळ तेवढयाने यश मिळणे कठीण.

इंदिराजींच्या सभेचाही वातावरण बदलण्यास थोडा फार उपयोग झाला. या सभेचे वेळी निदर्शने करण्याची पद्धाराजे समितीची योजना होती. परंतु समितीचे अध्यक्ष दादासाहेब निंबाळकर ! इंदिराजी या पक्ष प्रचारासाठी येत असल्याने त्याविरुद्ध निदर्शने करू नयेत. तशी केल्यास मी राजीनामा देऊन बाहेर पडेन. असे पत्रकच दादासाहेब निंबाळकरांनी काढून टाकले. दादासाहेबांचे हे पत्रकही पण एक राजकीय चाल होती. निदर्शने होती, तर दादासाहेब जरूर बाहेर पडते आणि परिस्थितीचा फायदा घेऊन मुलाचा प्रचार उघडपणे करते. दादासाहेबांचा प्रत्यक्ष प्रचार शेकापला महाग पडला असता, म्हणून समितीवरील शेकापच्या मंडळींनी निदर्शने रद्द करून दादासाहेबांना जागेवरच बांधून ठेवले.

संदेश, नवसंदेश, पुढारी, इंद्रधनुष्य आदि सर्व स्थानिक वृत्तपत्रे जीव तोडून कॉंग्रेसचा प्रचार करत आहेत. त्यांचे स्वरूप प्रचारकी थाटाचे आहे हे लोक ओळखून असले तरी रोजच्या रोज होणाऱ्या या माऱ्याचा थोडाफार परिणाम झाल्यावाचून रहाणार नाही.

प्रचाराची आघाडी, दोन्ही बाजूंनी जोरात आहे. इतर कोठेही आढळत नाही इतकी प्रचाराला धार चढली आहे. आचार संहिता खुंटीवर जाऊन बसली आहे. दडपशाहीचे, दादागिरीचे प्रकार वाढत आहेत. एकंदर परिस्थितीचा विचार करता सद्य: परिस्थितीत निवडणूक जिंकण्याची शक्यता बाबासाहेबांना अधिक आहे. प्रचाराच्या अखेरच्या फेरीत वातावरण त्यांनाच अधिक अनकूल होईल अशी शक्यता आहे.

## हातकणंगले मतदार संघ

जिल्ह्यातील दुसरी लोकसभेची जागा या मतदार संघातील. येथे लढत आहे शेकापचे कारखानीस आणि नव कॉंग्रेसचे दत्ताजी कदम यांच्यामध्ये. या मतदार संघा-

रशियन राज्यक्रांतिविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे

मध्ये खालील भाग येतो.

| | | |
|---|---|---|
| हातकणंगले | मतदार संख्या | ९१,३८७ |
| शिरोळे | ,, | ९६,१८७ |
| वडगाव | ,, | ८२,२९५ |
| शाहूवाडी | ,, | ७६,४४६ |
| पन्हाळा | ,, | ८२० ६५ |
| राधानगरी | ,, | ९०.३२७ |

एकूण मतदार– ५,१८.७०७

मतदान केंद्रे आहेत ७२९ आणि मतदानासाठी जावे लागणारे जास्तीत जास्त अंतर २ किलो मिटर.

या मतदार संघामध्ये वरील दोन उमेदवारांखेरीज अण्णाप्पा हळपा निगरे हे अपक्ष उमेदवार उभे आहेत. त्यांचा कोणीच गंभीरपणे विचार करीत नाही.

लोकसभेच्या गेल्या म्हणजे ६७ सालच्या निवडणुकीमध्ये या मतदार संघातून राजमाता विजयाराजे कॉंग्रेसच्या एस. पी. पी. थोरात यांचा पराभव करून निवडून आल्या होत्या. दत्तक प्रश्नावरून तापलेले वातावरण आणि राजघराण्याबद्दलचे प्रेम याचा त्यांना लाभ मिळाला आणि सर्वस्वी योग्य असूनही थोरातांचा बळी पडला. १९५७ मध्ये या जागेवर शेकापचे भाऊसाहेब महागावकर निवडून आले होते. त्यानंतर ६२ साली जागा राखीव असताना के. एल्. मोरे येथून निवडून गेले. सर्व साधारणपणे विरोधी पक्षांचे वर्चस्व असलेली ही जागा आहे.

लोकसभेच्या या मतदार संघाचे विधानसभेतील प्रतिनिधी व रत्नाप्पा कुंभार (शिरोळे-नवकॉंग्रेस). बाबासाहेब खंजीरे (हातकणंगले-नव कॉं.) के. एम. घाटगे (वडगाव-नव कॉं.), डी. वाय पाटील (पन्हाळा नव कॉं.), ही चार कॉंग्रेसची मंडळी व राऊ पाटील (शाहूवाडी-शेकाप). व गोविंद कणीकणे (राधानगरी-शेकाप). ही दोन शेकापची मंडळी करतात. रत्नाप्पा कुंभार गटाने शेकापच्या कारखानीसांना जवळ जवळ उघडपणे पाठिंबा दिला आहे. कुंभारांची माणसे शेकापच्या प्लॅटफॉर्मवर येऊन कॉंग्रेसवर टीका करीत आहेत. स्वत: रत्नाप्पांची अलिकडची भाषणेही तिखट व कॉंग्रेसवाल्याना झोंबणारी आहेत. शिस्तीचा बडगा निवडणूकपूर्व काळामध्ये उगारणे शक्यच नाही. कारण त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळेल अशा परिस्थितीत वातावरणात बदल घडवून आणण्यासाठी 'साहेबां'नी कोल्हापूरच्या मंडळींना साताऱ्यास बोलवून घेतले होते. त्यातून काय निष्पन्न झाले ते हे वार्तापत्र लिहीपर्यंत हाती आले नाही. परंतु रत्नाप्पांची सध्याची दुखावलेली मन:स्थिती पाहता कॉंग्रेसच्या दत्ताजी कदमांना निवडणूक चांगलीच जड जाईल असे दिसते.

दोन उमेदवारांच्या तुलनेत कोल्हापुरात जसे दाजीबा सरळ सरळ उजवे आहेत तसेच हातकणंगल्यामध्ये कारखानीस आहेत. उमेदवारांबाबत शेकापची बाजू सरळ सरळ उजवी आहे.


कारखानीस यांना हातकणंगल्यामध्ये त्रास होणार आहे, तो कदमांच्या आर्थिक ताकदीचा, आणि प्रचार यंत्रणेचा. कदमांची मित्रमंडळी खूप असून ते त्यांच्यासाठी मनापासून आणि प्रसंगी स्वतः झीज सोसून काम करीत आहेत. निवडणूक जिंकायची अशाच जिद्दीने श्रमाची आणि खर्चाची पर्वा न करता- कदम उत्साहाने काम करीत आहेत.

कदमांजवळ असलेले आर्थिक सामर्थ्य आणि प्रभावी प्रचार यंत्रणा कारखानीसांजवळ नाही. त्यांची व्यक्तिगत लोकप्रियता, निष्कलंक चरित्र्य, आणि पक्षाचे मतदार संघातील काम. या सामर्थ्यावर ते निवडणूक जिंकण्याची जिद्द बाळगत आहेत. परिस्थिती सरळ असती तर शक्यता 'फिफ्टी-फिफ्टी' होती. तथापि रत्नाप्पा गट कारखानीसांचे बाजूला उतरल्याने त्यांचे पारडे लक्षात येण्याइतके जड झाले आहे. त्यातच अजूनही लोकमानसामध्ये प्रतिमा टिकवून असलेल्या आणि गेल्या वेळी या मतदारसंघातून विजयी झालेल्या विजयमाला राणीसाहेबांनी कारखानीसांना पाठिंबा जाहीर केल्याने कॉंग्रेसवाले थोडेफार चमकले आहेत.

आघाडीचा उमेदवार या मतदार संघामध्ये नाही. पाठिंबा कुणास द्यायचा या बाबत आघाडीचे, तसेच आघाडीत नसलेल्या कम्युनिस्टांचे अद्यापही ठरलेले नाही. अर्थात ही अनिश्चितता त्यांना चार दोन दिवसात संपवावीच लागेल. या संदर्भात आघाडीचे कोल्हापूरातील उमेदवार श्री. बापुसाहेब पाटील यांचे बोलण्यावरून संसोपाचा तरी कारखानीसांना पाठींबा राहील असे दिसते. जनसघ, कम्युनिस्ट आणि जनसंघाचे आदेशही बहुधा कारखानीसांच्या बाजूने निघतील. आणि ते विरोधी गेले तरी पक्षाचा प्रत्यक्ष उमेदवार नसल्याने त्या आदेशाची कदर केली जाणार नाही. पक्षांचे अनुयायी पूर्णत्वाने व्यक्तिगत इच्छेप्रमाणे मतदान करतील. त्याचा लाभ कारखानीसांना मिळेल.

असे हे जिल्ह्यांचे एकंदर राजकीय चित्र. तुफान चुरशीने लढल्या जाणाऱ्या या निवडणुकीत कोल्हापूर मतदार संघातून बाबासाहेब निंबाळकर, (नवकॉंग्रेस) आणि हातकणंगलेमधून त्र्यं. सी. कारखानीस (शेकाप). विजयी होण्याची शक्यता आहे. निकाल काहीही लागला तरी चुरस शेवटपर्यंत कायम राहील असे वातावरण आहे.

□ □ □



# मंत्री : एक कैफियत

म. ना. पाटील

मंडळी, एखाद्या घडामोडीवरील माझी प्रतिक्रिया हे पेपरवाले छापायला अगदी सहज तयार असतात पण आमची घरेलू म्हंजी आमच्या मिसेसची एखादी प्रतिक्रिया कधी ऐकली आहे काय ? नाही ना मग ऐका तर–

बरं का, मी मंत्री झाल्यावर एक फसकलास गाडी आणली आणि मिसेसला म्हटलं, "काय आवडली की नाही गाडी ?" आमची मिसेस फारं हुशार ! मिसेसनी गाडी अगदी न्याहाळून पाहूचली आणि म्हटलं, "ही गाडी एकदम पसंत हाये मला, पण दुकानदारानं ह्यो आरसा वाकडा बसवलाय माझा चेहराबी नीट दिसत नाही त्यात !

आमच्या मिसेसने दाखवून दिलेली ही आरशाची 'मिष्टेक' बरोबर होती, मी दुसऱ्या दिवशी चेहरा नीट दिसेल असा मोठा आरसा लगेच बसवून आणला. झालेली मिष्टेक तावडतोब सुधारावी असं म्हणतात ते खरं आहे. आमचं मंत्र्याचं जीवन फार भानगडीचं आणि दगदगीचं ! 'एक मंत्री आणि बारा भानगडी' असा कोणी सिनेमा का काढत नाहीत ? मी म्हणतो शहाण्या माणसानं मंत्री होण्याच्या फंदात पडू नये.

मी मंत्री झाल्यापासून अनेक इमारतींच्या पायाचे दगड बसविले आहेत, अनेक ठिकाणची उद्‌घाटने केली आहेत, आणि सभा, संमेलनं

याची तर गणतीच नाही ! कुणाला नाही म्हणायचं ! आणि जनता जनार्दनाला नाही तरी कसं म्हणायचं ! मला भाषण कसं करायचं तेबी माहीत नव्हतं. पूर्वी लोकल बोर्डाचा प्रेसिडेंट असताना आमच्या गावच्या शाळेत बुद्ध जयंती साजरी झाली तेव्हा शाळेतल्या हेडमास्तरानी मला त्या समारंभाला अध्यक्ष म्हणन बोलावलं होतं, तेव्हा मास्तरांना मी विचारलं, " मास्तर, हे बुद्ध कोण हो ?" तेव्हा मास्तरानी बुद्धासंबंधी कागदावर लिहून दिलेली माहिती मी माझ्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात वाचून दाखविली. तेव्हा शाळेच्या पोरांनी टाळ्या वाजविल्या. सभेत उभं राहून बोलण्याचा हा माझा पहिला वखत ! तेव्हापासून आजपर्यंतच्या बुद्ध जयंतीपासून शाळेच्या चेअरमनच्या बापाच्या पुण्यतिथिपर्यंत सगळ्या कार्यक्रमातून मी आजतागायत शेकड्यांनी भाषणे ठोकली आहेत आणि म्हणून आता सभेला लाखो पब्लिक असली तरी मला त्याचं भय वाटत नाही.

मी मंत्री झाल्यापासनं जनतेला सारखी आश्वासनं देत आलो आहे आणि कोणत्याही मंत्र्याचं ते फर्स्ट कर्तव्य आहे. आता ती सर्वच्या सर्व पाळता येत नाहीत ती गोष्ट वेगळी ! आणि समजा दिलेली सगळी आश्वासनं आम्ही अमलात आणली तर आश्वासनं शिल्लक रहाणार कुठून ! दिलेली आश्वासनं पाळली की त्यातली मजा संपली आणि म्हणून सगळी अश्वासनं पाळण्यात आम्ही ' विंटरेस्ट ' घेत नाही. परवा माझ्या मुलानं म्हटलं, " बाबा मला नवे कपडे आणून देणार होता ना ? का मंत्र्यासारखचं आश्वासन आहे हे ! " यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की आमची ही आश्वासनं शेंबड्या पोरांनासुद्धा माहीत झाली आहेत.

मंत्री झाल्यानंतर मला प्रसिद्धीही फार मिळते आहे, मी काय बोलतो हे ऐकण्यासाठी हे पेपरवाले अगदी टपून बसलेले असतात आणि मी जे काही बोलतो ते अगदी नेमके टिपतात, म्हणून मला फार जपून बोलावं लागतं आणि बोलताना जर एखादी ' मिष्टेक ' झाली तर " माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. किंवा मला असं सांगायचं होतं " असा खुलासा करावा लागतो. येनकेन प्रकारेण मंत्री झाल्यापासूनं मला फार प्रसिद्धी मिळू लागली आहे, माझं डोकं दुखलं किंवा सर्दी झाली तरीही माझ्या तब्येतीविषयी पेपरात छापून येते. त्यामुळं मला असं वाटू लागलं आहे की मला एखादी शिंक किंवा जांभई आली तरी देखील हे पेपरवाले ते छापतील !

लोक म्हणतात मंत्री पैसे खातात. मी छातीवर हात मारून सांगतो की मी एक पैसासुद्धा कधी खाल्ला नाही. माझ्या नातेवाईकांच्या नावाने मी अनेक धंदे सुरू केल्याचा आणि अमुक अमुक धंद्यात माझी भागीदारी असल्याचे विरोधी लोकांकडून आरोप केले जातात. पण हे साफ खोटे आहे, अहो, जनतेचा पैसा खाल्ला तर पाप लागेल ! मंत्री होण्याआधीची गोष्टी आहे ही. व्ह. फा. ची परीक्षा पास झाल्यावर कामधंदा नाही म्हणून हातभट्टीचा धंदा केल्याचं ध्यानात आहे पण त्यात

समाजवाद होता. त्या धंद्यामुळं गावातल्या गरीब लोकांना स्वस्त दरानं दारू मिळत होती. माझ्या आठवणीतला तोच एक फर्स्ट आणि लास्ट धंदा ! पण मी जेव्हा माझ्या या धंद्याचं मंत्री झाल्यावर एका भाषणात गुपीत सांगितलं तेव्हा दुसऱ्याच दिवशी पेपरात एका चौकटीत—" विशाल जीवन-प्रवाहाच्या उगमापाशी " असं हे ' हेडिंग ' देऊन त्ये माझं गुपीत पेपरवाल्यांनी छापलं होतं. तेव्हा मला म्हणायचं काय की, मी मंत्री झाल्यापासनं माझा कोणत्याही धंद्याशी कसलाही संबंध नाही. जनता जनार्दनाची आन घेऊन मी हे सांगतो ! माझी मुलं कसले धंदे करतात. त्याचा माझ्याशी काय संबंध ? माझी सर्व मुलं आता स्वतंत्र झाली आहेत. माझा त्यांचा काहीचाही संबंध राहिला नाही.

आम्हा मंत्र्यांना सतत सतावणारे म्हणजे आमचे विरोधी पक्षातले लोक ! टेहळणी करून शत्रूच्या सैन्याच्या हालचालीवर जसे लक्ष ठेवतात तसे हे लोक डोळ्यात तेल घालून आमच्याकडे लक्ष देत असतात. आमचं जरा कुठं चुकलं की हे विरोधी पक्षाचे लोक आकाशपाताळ एक करतात. अहो, मंत्री झाला तरी तो शेवटी माणूसच ना ! त्याच्या हातून मिष्टेक व्हायचीच ! पण विरोधी पक्षाच्या लोकांना हे मंजूर नाही. आमच्या शेतीवाडी पासून हेरकंडीशन गाडी पर्यंत विरोधकांनी विचारलेल्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. शिवाय त्यांचे मोर्चे, हरताळ, शिष्टमंडळे ' बंद ' वगैरे गोष्टी तर आता नित्याच्याच होऊन बसल्या आहेत. घरात मिसेस आणि बाहेर हे विरोधी पक्षाचे लोक अशा कात्रीत सध्या मी सापडलो आहे. असे असूनही माझी मिसेस माझ्या पाठीशी नेहमी उभी असते. माझ्या लाईफमध्ये माझ्या मिसेसचा वाटा फार मोठा आहे. परवा एका मुलाखतीत यासंबंधी माझ्या मिसेसचा मी उल्लेख केला आणि त्यानंतर माझ्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त माझ्या कार्यासंबंधी छापलेल्या एका लेखात पेपरवाल्याने माझ्या मिसेससह माझा फोटो छापला होता. माझ्या मिसेसलाही अशी प्रसिद्धी मिळते.

माझा वाढदिवस असला की, वाढदिवसानिमित्त शेकडो लोक माझ्या निवासस्थानी भेटायला येतात, पेपरात माझ्या वाढदिवसाच्या छापलेल्या बातमीत या सर्व सर्व लोकांना ' हितचिंतक ' म्हटले जाते. मंत्री आणि वाढदिवस यांची ताटातूट फक्त काळच करू शकेल ! कधी कधी मी माझा वाढदिवस अगदी साध्या पद्धतीने साजरा करतो तरी सुद्धा पेपरात त्याला प्रसिद्धी मिळते.

मंत्री झाल्यापासून ठिकठिकाणी मला दौरे काढावे लागतात. माझ्या या दौऱ्यामुळे त्या ठिकाणचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची धावपळ कशी होते याची मला जाणीव आहे. दौऱ्याच्यावेळी अनेकांच्या भेटीगाठी घ्याव्या लागतात. त्यात कुणी गावाकडलं जिवाभावाचं मैतर असतात तर कुणी कर्मचाऱ्यांचं प्रतिनिधी असतात; कुणी ग्रामपंचायतीचं सरपंच असतात तर झेडपीचा प्रेशिडेंटपण असतो. कुणी हीरीची मागणी करतो, तर कुणी शाळेची मागणी करतो, कुणी रस्ता

मागतो तर कुणी महागाई वाढली म्हणून तक्रार करतो. अशा अनेक गोष्टी माझ्या दौऱ्यात येतात.

"मंत्र्याचा रोड मरणाच्या मैदानातून जातो. असं तुकोबा म्हणतात त्ये खोटं नाही.' अहो कधी कधी असं वाटतं की मैत्र्यांपेक्षा संत्री होणं लई बेष्ट !

आता राजीनाम्यासंबंधी बोलता. सहकाऱ्यांबरोबर माझे मतभेद आहेत. आणि म्हणून बऱ्याच वेळा वाटतं की, राजिनामा देऊन मोकळं व्हावं. पण प्रत्यक्ष राजिनामा देण्याचं डेरिंग होत नाही कारण माझा राजिनामा ताबडतोब मंजूर होईल अशी भीती वाटते. आणि म्हणून राजिनामा देणं ही गोष्ट सोपी नाहीं. माझं स्वत:चंच असं मत आहे की राजिनामा हा प्रकार कमी ष्टँडरचा आहे. मंत्री म्हणून केलेली जनतेची सेवा आणि मंत्रीपदाचा राजिनामा देऊन केलेली जनतेची सेवा यामध्ये लई अतर आहे. मंत्री झाल्यानंतर अनेक कारणामुळं जनता जवळ येते पण मंत्रीपद सोडल्यानंतर आपण जनतेजवळ जाव लागते आणि तिची सेवा करावी लागते.

मंत्री झाल्यानंतर माझ्या रहाणीतही बदल करावा लागला. अंगात खादीचे कपडे, डोक्यात टोकदार तिरकी टोपी आणि उच्च विचार त्याचप्रमाणे ओठामध्ये हसू अशी रहाणी मला ठेवावी लागते आहे. जनतेच्या स्वागताचा स्विकार करण्यासाठी माझे हात जोडलेले असतात. कारण जनतारुपी पांडुरंग आमच्या भेटीला आलेला असतो. त्यांनी दिलेल्या मतांमुळच मीं मंत्री झालो आहे हे विसरून चालणार नाही. जनता जनार्दनाचा आशिर्वाद हेच माझं मोठं सामर्थ्य आहे. त्यापेक्षा अधिक काय सांगावं ! आच्छा, नमस्ते !

□ □ □



# पराजित - अपराजित



वि. स. वाळिंबे : उत्तरार्ध : लेखांक चार

जनरल हेन्री जिराद हा अगदी सुमार बुद्धीचा माणस होता. द गॉलशी मुकाबला करावा एवढी त्याच्या व्यक्तित्वात तडफ नव्हती. अमेरिकेने हाताशी धरला म्हणून केवळ त्याला एवढे महत्व लाभले. अमेरिकेच्या बाबतीत नेहमीच असे घडत आलेलं आहे. ज्या माणसांना धड जमिनीवर घट्ट पाय रोवून उभे रहाता येत नाही नेमक्या अशाच माणसांबद्दल अमेरिकेला जिव्हाळा वाटत असतो. जिराद हा त्यां-पैकीच एक.

जिराद १९४० च्या मे मध्ये जर्मन सैनिकांच्या हाती सापडला आणि त्याला त्यांनी कोनिगस्टेन येथल्या किल्ल्यात बंदिस्त केले. दोन वर्षे तेथे काढल्यानंतर जिराद कोनिगस्टेन येथून पळाला आणि व्हिशी येथे येऊन पोचला. कारण मार्शल पेताँ हा जिरादच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ नेता होता.

त्यामुळे, स्वतःच्या हिमतीवर फ्रान्स दास्यमुक्त करण्याचे द गॉलचे स्वप्न जिरादला वेडगळ वाटत होते. पेतॉं सरकारपाशी असलेले एक लाख सैन्यच अखेरीस

फ्रान्सची जर्मनीच्या वर्चस्वापासून मुक्तता करील अशा भ्रमात तो वावरत होता.

जिराद व्हिशी येथे येऊन पोचल्यानंतर काही दिवसांच्या आतच अमेरिकन लष्कराच्या प्रतिनिधींनी त्याची भेट घेऊन, तो आपल्या तंत्राने कितपत वागेल याचा अंदाज घेतला. १९४३ च्या मेमध्ये अँग्लो अमेरिकन सेनेने उत्तर आफ्रिकेमध्ये चढाईचे धोरण स्वीकारावे आणि त्याच वेळेला दक्षिण फ्रान्समध्ये दुसरी आघाडीही उघडावी या सूचनेवर ब्रिटन आणि अमेरिका यांच्या दरम्यान विचार होत होता. या योजनेसंबंधी जिरादचे मत जाणून घ्यायला युरोपीय युद्धाची सूत्रे सांभाळणारे अँग्लो-अमेरिकन सेनानी उत्सुक होते. अँग्लो-अमेरिकन सेनेच्या दक्षिण फ्रान्समधील दुसऱ्या आघाडीला जिरादचा विरोध नव्हता. इतकेच नव्हे तर तो मोठ्या उत्साहाने म्हणाला, "अँग्लो अमेरिकन सेना फ्रान्समध्ये उतरताच पेतॉ सरकारच्या हाताखालचं एक लाख सैन्यही जर्मनीविरुद्ध लढू लागेल."

परंतु पुढच्या घटना लक्षात घेता जिरादला व्हिशी येथल्या फ्रेंच सैनिकांच्या मनाचा अंदाज आला नव्हता असे म्हटले पाहिजे. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार अँग्लो-अमेरिकन सेनेने प्रथम उत्तर आफ्रिकेमधून जर्मन लष्कराची हकालपट्टी केली आणि त्यानंतर तिने फ्रान्समध्ये उतरून तेथल्या जर्मन लष्करालाही फासबाहेर पिटाळून लावले, आपल्या स्वतःच्या भूमीवर परकीय सेना हा एवढा लष्करी पराक्रमाचा आविष्कार घडवित असतानाही फ्रेंच सैनिकांना किंचितही स्फुरण चढले नाही. जर्मन सेनानींनी हुकूम देताच या सैनिकांनी आपल्याजवळची शस्त्रे त्यांच्या ताब्यात दिली आणि फ्रेंच भूमीवरील लढाईच्या वेळी त्यांनी निव्वळ तटस्थ प्रेक्षकाची भूमिका स्वीकारली.

व्हिशी सरकारच्या सेनेत असलेल्या फ्रेंच सैनिकांबद्दल जिरादला विश्वास वाटत असला तरी अमेरिकन सेनाधिकाऱ्यांना हे सैन्य काय लायकीचे आहे हे माहित होते. त्यामुळे त्यांनी जिरादला उत्तर आफ्रिकेमध्ये येण्याविषयी सुचविले रॉबर्ट मर्फीच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'उत्तर आफ्रिका प्रतिकार समिती'चे नेतृत्व जिरादकडे सोपवावे असा त्यामागचा विचार होता.

अमेरिकन सेनानी आपल्या प्रतिनिधींमार्फत जिरादशी बोलणी करीत असताना द गॉलला या बेताचा सुगावा लागू नये याविषयी ते दक्षता घेत होते. त्यामुळे द गॉल याला, आपल्याला शह देण्यासाठी जिरादचा वापर करण्यात येणार आहे याची प्रारंभी काहीच कल्पना नव्हती. म्हणून त्याने जिराद, जर्मनांच्या कैदेतून सुटून परत येताच, त्याला आपल्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'मध्ये सहभागी होण्याविषयी आवाहन केले. अमेरिकेच्या मदतीने आपले महत्त्व वाढविण्याच्या प्रयत्नात दंग असलेल्या जिरादने या पत्राला साधे उत्तर देखील धाडले नाही.

जिरादच्या मुग्धतेचा अर्थ हळूहळू द गॉलच्या ध्यानात येऊ लागला. व्हिशी सरकारचा प्रधानमंत्री लाव्हल आणि जर्मन परराष्ट्रखाते यांच्या दरम्यान काही तरी

गुप्त करारमदार झाला असला पाहिजे आणि त्या करारनुसार जिरादला आपल्या कैदेतून पळून जाण्याची जर्मनीने संधी दिलेली असावी असा रास्त संशय द गॉलने व्यक्त केला.

उत्तर आफ्रिकेला येण्याचे अमेरिकन सेनानींचे निमंत्रण जिरादने स्वीकारल्यानंतर सहा नोव्हेंबरच्या पहाटे एक ब्रिटिश पाणबुडी दक्षिण फ्रान्सच्या किनाऱ्यावरील बंदरापाशी घिरटया घालू लागली. जिराद अगोदरच तेथे येऊन हजर राहिला होता. तो या पाणबुडीतून उत्तर आफ्रिकेमध्ये जाणार होता. परंतु ही पाणबुडी अल्जियर्सला नेण्याऐवजी जिब्रॉल्टरकडे वळविण्यात आली. तसे करण्यामागचे कारण स्पष्ट होते. अमेरिकन सरसेनानी जनरल आयसेनहौवर याचा त्यावेळी जिब्रॉल्टरला मुक्काम होता. त्यामुळे जिरादने उत्तर आफ्रिकेमध्ये कसे वागावे यासंबंधीच्या सूचना देण्याची जबाबदारी आयसेनहौवरने स्वतःकडे घेतली. ज्या दिवशी आयसेनहौवर आणि जिराद यांची जिब्राल्टर येथे भेट झाली त्या दिवशीच मोरोक्कोमधील मोगाडोर आणि पूर्व अल्जेरियातील बोन या शहरांच्या दरम्यान अँग्लो–अमेरिकन सेना उतरत होती. आपल्या सेनेला अल्जेरियातील व्हिशी सरकारच्या फ्रेंच सैनिकांकडून विरोध होणार नाही ही अँग्लो–अमेरिकन सेनानींची कल्पना चुकीची ठरली.

ब्रिटनचा कट्टर विरोधक अॅडमिरल दार्ला अल्जियर्समध्ये तळ ठोकून राहिला होता. त्याच्या आदेशानुसार व्हिशी सैनिक आपल्याला विरोध करीत असल्यामुळे हा विरोध मोडून काढण्याचे कार्य जिरादने पार पाडावे असे आयसेनहौवरने सांगितले. नऊ नोव्हेंबरला जिराद अल्जियर्स बंदरामध्ये उतरला.

अँग्लो–अमेरिकनांनी आपल्याला निष्प्रभ करून टाकण्यासाठी जिरादला अल्जियर्सला धाडलेले आहे हे कळताच दार्लाचा विरोध अधिकच उग्र झाला. दार्लावर मात करणे जिरादला जमण्यासारखे नाही हे आयसेनहौवर याला अल्पावधीतच कळून आले आणि त्यामुळे त्याने दार्ला आणि जिराद यांच्यात एकोपा घडवून आणण्याचा प्रयत्न आरंभिला. उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच प्रशासनाचे नेतृत्व दार्लाकडे असावे आणि या प्रशासनाचे सरसेनानीपद जिरादला देण्यात यावे अशी योजना आयसेनहौवरने जनरल नोग्युए याच्या कानावर घातली.

दार्लाला जिरादसंबंधी कमालीचा तिरस्कार वाटत होता. जिरादसारखा सामान्य वकुबाचा सेनाधिकारी अँग्लो–अमेरिकनांनी आपल्या दावणीला बांधावा ही गोष्ट दार्लाला रुचणे शक्यच नव्हते. तो रॉबर्ट मर्फीला म्हणाला, "जिराद हा तुमच्या अपेक्षेप्रमाणे काही करून दाखवील अशी जर कल्पना असेल तर तो तुमचा भ्रम आहे. राजकारणातलं त्याला एक अक्षरदेखील कळत नाही. एक सामान्य सेनाधिकारी यापेक्षा त्याला काहीच महत्त्व नाही."

आयसेनहौवर आणि रॉबर्ट मर्फी यांनी दार्लासारख्या जर्मनीला सर्वस्वी अनुकूल

असलेल्या अधिकाऱ्याशी बोलणी करावीत ही गोष्ट ब्रिटिश आणि अमेरिकन नागरिकांना आवडले नाही. त्यांच्या या धोरणाबद्दल वृत्तपत्रातून टीका होऊ लागली. जनमानसाचा प्रतिकूल अभिप्रायांचा स्वर शेवटी इतका उंचावर गेला की स्वतः अध्यक्ष रुझवेल्ट यांना खुलासा करावा लागला—'सद्य:स्थितीत तसे करणे भाग होते. दार्ला आपला निकटचा मित्र होईल अशी खोटी कल्पना आम्ही करून घेतलेली नाही.'

केवळ लोकांचे तोंड बंद करण्यासाठी हा खुलासा करण्यात आला होता असे नाही. दार्लाचा नाही म्हटला तरी थोडा उपयोग होत होता. डाकारचा गव्हर्नर-जनरल बोईसाँ अँग्लो-अमेरिकनांना वश झाला त्यामागे दार्ला याचे परिश्रमच मुख्यत: कारणीभूत होते. द गॉलची सेना मदतीला घेऊन तिच्यामार्फत उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच प्रदेश ताब्यात घेण्यापेक्षा व्हिशी सरकारच्या तेथल्या अधिकाऱ्यांना आंजारून-गोंजारून आपल्या बाजूला वळवून घेणे इष्ट ठरेल हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून आयसेनहॉवर आणि मर्फी यांची पावले पडत होती आणि मर्यादित प्रमाणात ते उद्दिष्ट सफलही होत होते.

दार्लाला मोठेपणा देऊन त्याला मुत्सद्देगिरीने हाताळण्याचा अमेरिकन सेनानींचा बेत सिद्धीला जात असताना, सर्वस्वी अनपेक्षित अशी एक घटना घडली की जिच्यामुळे हा बेत अर्धवट अवस्थेतच विराम पावला.

पंचवीस डिसेंबरला अल्जियर्स येथे दार्लाचा खून झाला.

त्याबद्दल बोन्निए द ला शापेल या तरुणावर जिरादने लष्करी न्यायालयामध्ये खटला भरला आणि त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. दार्लाच्या मारेकऱ्याला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे शिक्षा मिळाली, परंतु शापेलच्या या कृत्यामागे व्हिशी सरकारचा हात होता की द गॉलची फूस होती या संबंधीची निश्चित माहिती कधीच उजेडात येऊ शकली नाही.

उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच प्रशासनाचा प्रमुख म्हणून दार्लाच्या जागी जिरादची नेमणूक झाली.

एवढ्या मोठ्या भूभागाची सत्तासूत्रे आपल्या हातात आल्यानंतर जिरादचे डोके भडकले. दार्लाला मागे टाकील अशी निर्घृण दडपशाही त्याने सुरू केली. लष्करी खात्यात जीवन व्यतीत केलेल्या जिरादला सत्तेचा कैफ असा काही चढला की एखाद्या स्वयंभू हुकूमशहासारखा तो वागू लागला. विशेषत: द गॉलच्या अनुयायांचा काटा काढण्यावर त्याचा भर होता. रेने कापितान्तसारखा द गॉलचा सहकारी जिरादच्या पकडीतून पळून गेला, परंतु सगळ्यांनाच असे पळून जाणे शक्य झाले नाही. त्यांची पाठवणी छळछावण्यामध्ये करण्यात आली. अनेकांवर हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला. आपण मार्शल पेताँशिवाय दुसऱ्या कोणालाही मानीत नाही हे दाखविण्यासाठी जिरादने सर्व सरकारी कचेऱ्यांमध्ये पेताँचा

छाया चित्रे लावण्याचे फर्मान सोडले. पेतांची राजवट उलथून पाडण्यासाठी गॉल-वाद्यांप्रमाणे कम्युनिस्ट आणि स्पॅनिश प्रजासत्ताकवादी प्रयत्न करीत होते. त्यामुळे जिरादने उत्तर आफ्रिकेतील कम्युनिस्ट आणि स्पॅनिश प्रजासत्ताकवादी कार्यकर्ते मिळून जवळजवळ पन्नास हजार लोकांना छल-छावण्यांमध्ये कोंबले.

आपल्याला जर फ्रेंच जनतेची सहानुभूती कायम राखायची असेल तर जिरादच्या या बेबंद कारभाराला आवर घातला पाहिजे हे अमेरिकन सेनानींना कळून चुकले. त्यांनी तसे जिरादला सांगून पाहिले. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. काही तरी सबब सांगायची म्हणून जिराद म्हणाला, " रॉबर्ट मर्फी याचा खून करण्याचा गॉलवाद्यांनी कट केल्याचा मला सुगावा लागला असल्यामुळे मला ही कठोर उपाययोजना करावी लागत असताना, अमेरिकन अधिकाऱ्यांनी मला जाब विचारावा हे मोठं अजब आहे."

जिरादच्या द गॉल-विरोधाने यावेळी इतका कळस गाठला होता की द गॉल, त्याची 'स्वतंत्र फ्रेंच समिती' आणि त्याचे लेक्लेर्क, लामिनात यांच्यासारखे मातब्बर सहकारी यांची नावे उच्चारायलाही बंदी करण्यात आली.

जिराद पेतां सरकारच्या इशाऱ्यावर हुकूम चालवणारा असल्यामुळे, पेतां सरकारविरुद्ध उठाव करण्याचा अँग्लो-अमेरिकनांचा आग्रह त्याला मान्य होणे शक्य नव्हते. त्यामुळे त्याने जाहीर केले—"फ्रान्स जर्मनीच्या ताब्यातून मुक्त झाल्याशिवाय स्वतंत्र फ्रेंच सरकारच्या स्थापनेची घोषणा करणे सर्वस्वी चुकीचे आहे."

जिराद आणि द गॉल यांच्यात मुख्य फरक होता तो हाच.

स्वतंत्र फ्रेंच सरकारच्या घोषणेबद्दल जिराद पूर्णपणे उदासीन होता तर प्रथम उत्तर आफ्रिकेमध्ये स्वतंत्र फ्रेंच सरकार स्थापन करावे आणि योग्य वेळ येताच या सरकारने फ्रान्समध्ये प्रयाण करावे यासाठी द गॉलचा जीव तडफडत होता. जिरादच्या धोरणाचा आणखी एक घातक परिणाम द गॉलचे काळीज कुरतडत होता. स्वतंत्र फ्रेंच सरकारच्या प्रस्थापनेबाबत उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच प्रशासन निष्क्रिय राहिले तर फ्रान्समधील कम्युनिस्ट तातडी करून फ्रान्समधील सत्ता आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करतील ही भीती द गॉलच्या डोळ्यासमोर एखाद्या अक्राळविक्राळ भुताप्रमाणे नाचत होती.

त्यामुळेच, ज्या माणसाचे तोंड पहायची द गॉलची इच्छा नव्हती, त्याला भेटीचे निमंत्रण द्यायची त्याच्यावर पाळी आली. द गॉलने जिरादला लिहिले, "आपली दोघांची लवकर भेट होणे अतिशय अगत्याचे आहे. त्याबाबत माझी फक्त एकच अट आहे. ब्रिटिश किंवा अमेरिकन अधिकाऱ्यांनी त्यावेळी लुडबूड करता कामा नये."

द गॉलला आपली भेट कशासाठी हवी आहे हे जिरादला कळून आले होते.

त्यामुळे तो द गॉलच्या पत्राला उत्तर द्यायची टाळाटाळ करू लागला.

जिराद भेटत नाही आणि अँग्लो-अमेरिकन नेते आपल्याला वाजवी महत्त्व देत नाहीत अशी अवहेलनेची दुधारी सुरी द गॉलच्या मानी मनावर वाटेल तशा जखमा करीत होती. बी. बी. सी. वरून आपल्या देशबांधवांशी हितगुज करण्याची त्याची सवलत हिरावून घेण्यात आली होती. ही सारी परिस्थिती पाहून द गॉलच्या हृदयात उद्विग्नतेचे कढत कढ येत होते.

१९४३ च्या जानेवारीमध्ये चर्चिल आणि रूझवेल्ट यांची कासाब्लान्का-जवळील अन्फा येथे भेट झाली. यापुढची युद्धाची रूपरेषा ठरविण्यासाठी हे दोन नेते मुद्दाम एकत्र आले होते. अद्यापि उत्तर आफ्रिकेतील लढाई पूर्णपणे थांबलेली नव्हती. त्याचप्रमाणे फ्रान्समध्ये दुसरी आघाडी उघडण्याची शक्यताही दृष्टिपथात आलेली नव्हती. त्यामुळे द गॉलची संपूर्ण उपेक्षा करणे उचीत ठरणार नाही हे ओळखून चर्चिलने द गॉलला अन्फा येथे येण्याविषयी पत्र धाडले.

द गॉल गप्प बसला. त्याने चर्चिलच्या निमंत्रणाला काहीच उत्तर धाडले नाही. चर्चिलने दुसरे पत्र लिहिले—"हे निमंत्रण मी देत असलो तरी तू इथे यावेस ही काही माझी एकटयाची इच्छा नाही. तू इथे यावेस असे रूझवेल्टलाही वाटते. त्यामुळे आमचं निमंत्रण तू स्वीकारले नाहीस तर ब्रिटन-अमेरिकेला तुझ्याबरोबरचे संबंध तोडावे लागतील."

द गॉल अन्फा येथे जाऊन पोचला. चर्चिलने जिरादलाही तेथे बोलावून घेतले होते. त्यामुळे अगदी अनपेक्षित रीतीने द गॉल आणि जिराद यांची भेट झाली. द गॉल त्याला म्हणाला, "तू जर्मनीतून पळून आल्यानंतर लगेच आमच्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'त यायला हवं होतंस. पण तसं घडलं नाही. इतकच नव्हे तर तू व्हिशी सरकारच्या उत्तर आफ्रिकेतल्या अधिकाऱ्यांशी म्हणजे प्रच्छन्न देशद्रोह्यांशी संगनमत केलंस. तुला हे माहीत असायला हवं होतं की, पेतॉनं हिटलरपुढे लोटांगण घातल्यानंतर फ्रान्सच्या स्वातंत्र्यासाठी फक्त 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च लढत आहे."

जिरादने काहीच उत्तर दिले नाही.

द गॉलला अन्फा येथे बोलावून घेण्यामागे चर्चिलची भूमिका स्पष्ट होती. फ्रेंच आफ्रिकेतील बऱ्याचशा प्रदेशावर द गॉलच्या स्वतंत्र फ्रेंच समितीची सत्ता प्रस्थापित झालेली होती. लेक्लेर्क आणि लार्मिनात हे द गॉलचे सहकारी जेथे संधी मिळेल तेथे जर्मन सेनेला झोडपत होते. असे असले तरी अमेरिकन अधिकाऱ्यांनी उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच प्रदेशांचा सरसेनानी म्हणून जिरादची नेमणूक केली होती. त्यामुळे साहजिकच द गॉल रूष्ट होता. त्याच्या मनातील ही कटुता दूर करावी आणि द गॉल व जिराद यांच्यात समझोता घडवून आणावा यासाठी चर्चिलने त्या दोघांना अन्फा येथे बोलावून घेतले होते. या दोघात दिलजमाई झालेली आहे हे दाखविण्यासाठी त्यांचे एकत्र छायाचित्र घेण्याची चर्चिलने कल्पना काढली. त्या-

प्रमाणे द गॉल आणि जिराद हस्तांदोलन करीत आहेत आणि त्यांचा हा मिलाप चर्चिल आणि रूझवेल्ट हसतमुखाने पहात आहेत असे छायाचित्र काढण्यात आले. खोट्या मैत्रीचा हा देखावा द गॉलला मान्य नव्हता. त्यामुळे छायाचित्राचा कार्यक्रम आटोपल्यानंतर तो रूझवेल्टला म्हणाला, "अध्यक्षमहाशय, तुमचा शब्द मोडायचा नाही म्हणून मी फोटोला उभा राहिलो इतकंच."

त्यानंतर द गॉल अन्फा येथे थांबलाच नाही. तो तडक लंडनला परतला.

द गॉलचा हा त्रागा ठीक होता, परंतु अँग्लो-अमेरिकनांनी जिराद याला हाताशी धरल्यामुळे, द गॉलची अवस्था अधिकच बिकट झाली. आपण एवढी धडपड करीत असताना चर्चिल आणि रूझवेल्ट या मित्रराष्ट्रांच्या नेत्यांना आपली मातबरी वाटू नये याचा काटा त्याच्या मनाला बोचत होता. मात्र तरीही, जर्मनी-विरुद्ध फ्रान्स लढत आहे हे कृतीने दाखवून देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे या कर्तव्याचा त्याला विसर पडला नव्हता.

फ्रेंच जनतेलाही हळूहळू का होईना, द गॉलच्या धडपडीची महती जाणवायला लागली होती. हे जनमत आपल्याकडे कसे अधिक झुकेल या दृष्टीने द गॉलला आता तातडी करायची होती.

गेल्या तीन वर्षातील अनुभवाने द गॉल बरेच शिकला होता.

फ्रान्समधील प्रतिकार–मोहिमेची सूत्रे कम्युनिस्टांच्या हाती आहेत हे त्याला माहित होते. म्हणून तो अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणातील काळी बाजू लोकांना विशद करून सांगू लागला. तो म्हणायचा, "अमेरिकेला फ्रान्समध्ये आपलं हस्तक सरकार प्रस्थापित करायचं आहे. म्हणून मी जिरादला विरोध करीत असून आल्जयर्स-मधील त्याची सत्ता उखडून टाकण्याचं मी ठरविलं आहे."

या कार्यात रशिया आपल्याला हमखास मदत करील हे त्याला माहित होते.

द गॉल मॉस्कोतील प्रतिनिधी गारो मोलोटोव्ह, व्हिशिन्स्की, लोझोव्हस्की आदी नेत्यांना वारंवार भेटू लागला. गारो रशियन नेत्यांना एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगत होता–"रशियानं आम्हाला मदत केली म्हणून आमची 'स्वतंत्र फ्रेंच समिती' इतका वेळ टिकाव धरू शकली. ब्रिटन–अमेरिकेवर आम्ही अवलंबून राहिलो असतो तर आमचा केव्हाच निकाल लागला असता."

३० मार्च १९४३ या दिवशी द गॉल आणि बोगोमोलोव्ह यांची भेट झाली. त्यावेळी द गॉलने सांगितले, "नुकताच कार्डिनल स्पेलमन मला भेटायला आला होता. रुझवेल्टनंच त्याला माझ्याकडे धाडलं असलं पाहिजे. मी जिरादचं नेतृत्व बिनतक्रार मान्य करावं, अन्यथा 'स्वतंत्र फ्रेंच समिती'ला अमेरिकेकडून एक पैही मिळणार नाही अशी त्यानं मला धमकी दिली."

अमेरिकन सेनाधिकारी द गॉलच्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'बाबत किती अनुदार धोरण स्वीकारीत असतात याचे पुरावे गारो रशियन नेत्यांच्या कानावर घालीत

असे. तो एकदा मोलोटोव्हला म्हणाला, " टचुनिशियाच्या लढाईमध्ये जिरादचे पन्नास हजार सैनिक भाग घेत होते. त्याबद्दल अमेरिकेकडून जिरादचा केवढा उदो-उदो चालला होता. परंतु एकटा जिरादच काही मदत करीत नव्हता. लेक्लेर्कच्या नेतृत्वाखाली द गॉलचे तीस हजार सैनिकही तिथं लढत होते. परंतु त्याबाबत अमेरिकन सेनानींनी प्रशंसेचा एक शब्ददेखील उच्चारला नाही "

अमेरिकेच्या पाठिंब्यामुळे जिरादचे महत्त्व वाढू लागले तसा जिरादच्या महत्त्वाकांक्षेने जोम धरला. हे युद्ध संपल्यानंतर फ्रान्सचे आपण सर्वसत्ताधीश व्हावे हा विचार त्याच्या मनात घिरट्या घालू लागला. उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच सैन्य घेऊन आपण दक्षिण फ्रान्समध्ये उतरावे आणि तेथील प्रतिकार–समित्यांना मोडून काढून नव्या प्रजासत्ताकाची घोषणा करावी या कल्पनेने त्याला पछाडले. ते न जमले तर प्रजासत्ताक राजवट सुरक्षित ठेवण्याचा बहाणा करून पेताँ सरकार स्थिरपद करावे असा पर्याय त्याला सुचला.

जिराद स्वप्नरंजनामध्ये दंग होता तर द गॉल याला आपण केव्हा एकदा अल्जियर्समध्ये स्वतंत्र फ्रेंच सरकारची घोषणा करतो असे झाले होते. जिरादच्या भूमिकेत आणि आपल्या भूमिकेत जमोन–अस्मानाचा फरक आहे हे आपल्या देशबांधवांना कळावे म्हणून द गॉलने जाहीर केले–" फ्रान्समध्ये कोणती राजवट असावी हे ठरविण्याचा अधिकार फ्रेंच जनतेचा आहे. त्याबाबतीत जर्मनीचा किंवा जर्मनीच्या तंत्रानं चालणाऱ्या पेताँ सरकारचा हस्तक्षेप आम्ही मुळीच सहन करणार नाही "

राष्ट्रीय अस्मितेने सळसळणाऱ्या या शब्दांचा योग्य तोच परिणाम झाला. द गॉल हाच आपला तारणहार आहे असा विश्वास फ्रेंच नागरिकांच्या मनात बळावू लागला.

जिरादसंबंधी नेमके उलटे घडत होते. अमेरिकन लष्कराच्या पाठिंब्याची कुबडी घेऊन हिंडणारा जिराद काहीही करू शकणार नाही असे फ्रेंच नागरिक उघड बोलू लागले. त्यामुळे द गॉल आणि जिराद यांच्यात दिलजमाई घडवून आणल्याखेरीज, आपल्याला फ्रेंच जनमानसामध्ये स्थान मिळणार नाही हे अमेरिकन नेत्यांनी ओळखले. म्हणून त्यांनी द गॉलबाबत जिरादची समजूत काढण्यासाठी मॉनेत याला अल्जियर्सला धाडले. अमेरिकेची मदत चालू राहिली तरच आपले स्थान टिकणार आहे याची जाणीव असल्यामुळे जिरादने मॉनेतची सूचना मान्य केली. जिराद द गॉलशी समझोता करीत आहे ही बातमी कळताच व्हिशी सरकार अस्वस्थ झाले. ' जिराद पेताँशी विश्वासघात करीत आहे ' असा त्याच्यावर आरोप होऊ लागला.

पुन्हा जिरादचे मन फिरले.

म्हणून जनरल कात्रु अल्जियर्सला गेला आणि सारी परिस्थिती जिरादला समजावून सांगण्यासाठी त्याने दोन महिने खर्च केले. शेवटी कसाबसा जिराद तयार

झाला. तो कात्रुला म्हणाला, "मी द गॉलला इथं बोलवून घेतो."

त्याप्रमाणे जिरादचे पत्र गेले आणि तीस मे रोजी द गॉल अल्जियर्समध्ये येऊन दाखल झाला. अल्जियर्समधील जनतेने द गॉलचे भव्य स्वागत करावे ही गोष्ट जिरादला आवडली नाही. परंतु तो गप्प बसला. परंतु अल्जेरियाचा गव्हर्नर जनरल पेरुतॉ याचा राग शमला नाही, त्याने आपल्या अधिकारपदाचा राजिनामा जिराद-कडे धाडून दिला.

द गॉल आणि जिराद यांच्यात वाटाघाटी होऊन तीन जून रोजी 'राष्ट्रीय मुक्ती समिती' स्थापन करण्यात आली आणि तिचे अध्यक्षपद द गॉल आणि जिराद या दोघांनी भूषवावे अशी तडजोड मान्य झाली. ताबडतोब द गॉलने 'राष्ट्रीय मुक्ती समिती'चा अध्यक्ष या नात्याने जाहीर केले–'या समितीच्या नेतृत्वाखाली फ्रान्सच्या सर्व युद्ध प्रयत्नांचं एकसूत्रीकरण करण्यात येणार असून मध्य, पश्चिम आणि उत्तर आफ्रिकेतले सर्व फ्रेंच प्रदेश या समितीच्या नियंत्रणा-खाली आणण्यात येतील. जेव्हा केव्हा फ्रान्समध्ये स्वतंत्र फ्रेंच सरकार स्थापन होईल तेव्हा आमची समिती आपले सर्व अधिकार त्या सरकारकडे सुपूर्द करील. व्हिशी येथील मार्शल पेतॉंची एकतंत्री राजवट उखडून टाकून तिथं प्रजासत्ताक सरकार स्थापन करायचे असा आमच्या समितीनं निर्धार केला आहे."

या 'राष्ट्रीय मुक्ती समिती'च्या निमित्ताने द गॉलची बरेच दिवस घुटमळत असलेली मनीषा साकार झाली. त्याला उत्तर आफ्रिकेमध्ये पायारोवा करण्याची संधी मिळाली. लागलीच त्याने समितीच्या कार्यकारिणीची बैठक बोलावून बोईसॉ, नोग्यूए यांच्यासारखे व्हिशी सरकारचे हस्तक बडतर्फ करण्याचा निर्णय केला.

द गॉलचे हे सर्वस्वी स्वतंत्र धोरण अमेरिकेला पसंत पडणे शक्यच नव्हते. परंतु द गॉलला आता अमेरिकेच्या रागलोभाची फिकीर उरलेली नव्हती. त्याने अल्जि-यर्स नभोवाणी-केंद्रावरून फ्रेंच जनतेला उद्देशून जाहीर केले–'अल्जेरियामध्ये स्वतंत्र फ्रान्सचं सरकार स्थापन झालेलं असून ते लवकरच पॅरिसला येत आहे."

द गॉल जिरादला बिलकूल विचारीत नाही, राष्ट्रीय मुक्ती समितीच्या नावा-खाली त्याने सर्व अधिकार आपल्याकडे घेतले आहेत याचा आता दररोज प्रत्यय येऊ लागला होता. त्यामुळे सचिन्त मनःस्थितीमध्ये चर्चिल आणि ईडन अल्जियर्सला आले आणि त्यांनी द गॉलला बजाविले, "फ्रेंच जनतेच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये हस्त-क्षेप करायची आमची इच्छा नाही. पण 'राष्ट्रीय मुक्ती समिती'तून जिरादची हकालपट्टी करण्याचा कोणी प्रयत्न करणार असेल तर तोही आम्ही सहन करणार नाही."

चर्चिलप्रमाणेच आयसेनहॉवर यालाही द गॉलच्या आक्रमक वृत्तीचा राग आलेला होता. तो त्याने द गॉलच्या कानावर घालताच द गॉल संतापाने म्हणाला, "नामधारी प्रमुख व्हायला मी तयार नाही. माझे धोरण तुम्हाला मान्य नसेल तर

'राष्ट्रीय मुक्ती समिती 'मधून मी बाहेर पडतो. मग तुम्हाला पाहिजे ते तुम्ही करा. जे मला योग्य वाटेल ते मी करीन."

द गॉल जर का 'राष्ट्रीय मुक्ती समिती 'तून बाहेर पडला तर ही समिती तात्काळ कोसळेल हे चर्चिल व आयसेनहॉवर यांना माहित होते. त्यामुळे थोडा वेळ ते कुरकुरले, पण नंतर गप्प बसले.

'राष्ट्रीय मुक्ती समिती 'मध्ये आपल्याला विरोध होता कामा नये म्हणून द गॉलने कार्यकारिणीच्या सदस्यांची संख्या सातावरून प्रथम चौदावर आणि नंतर सोळावर नेली आणि त्यांतील बहुसंख्य सदस्य आपल्या मताचे राहतील अशा रीतीने नव्या सदस्यांची निवड केली. 'राष्ट्रीय मुक्ती समिती 'वरची द गॉलची पकड पक्की झाली.

हे सारे पाहून जिराद भांबावला आणि लष्करी अभ्यासासाठी दौरा करण्याचे निमित्त सांगून तो अमेरिकेला गेला. ती संधी साधून द गॉलने 'राष्ट्रीय मुक्ती समिती 'च्या अध्यक्षपदावर एकच व्यक्ती असावी अशी दुरुस्ती कार्यकारिणीकडून मंजूर करून घेतली आणि त्यामुळे समितीचे अध्यक्षपद त्याच्या एकटयाकडे आले. 'राष्ट्रीय मुक्ती समिती 'मध्ये जिरादला आता काहीही महत्त्व उरलेले नाही हे आढळून आल्यानंतर, द गॉलला शह देण्यासाठी भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष लेब्रन याला अल्जियर्सला आणण्याचा अँग्लो-अमेरिकन नेत्यांनी प्रयत्न केला; परंतु तो फलद्रुप होऊ शकला नाही. त्यानंतर सहा महिन्यांच्या आतच द गॉलने जिरादला 'राष्ट्रीय मुक्ती समिती 'तून हाकलून दिले.

हे सारे होपर्यंत १९४४ साल उजाडले होते. महायुद्धाच्या परिस्थितीत खूप बदल झालेला होता. सर्वच आघाडयांवर जर्मनीची पिछेहाट सुरू झालेली होती. त्यामुळे जर्मनीविरुद्ध फ्रान्समध्ये दुसरी आघाडी उघडणे ब्रिटन–अमेरिकेला शक्य झाले होते.

सहा जूनला नॉर्मंडीमध्ये अँग्लो-अमेरिकन सैन्य उतरू लागले. तत्पूर्वी तीन जूनला अल्जियर्स-नभोवाणीवरून द गॉलने जाहीर केले–'राष्ट्रीय मुक्ती समिती' हेच फ्रान्सचं हंगामी सरकार असून स्वतंत्र फ्रान्सची सूत्रं या हंगामी सरकारकडेच आली पाहिजेत."

या घोषणेचा अर्थ स्पष्ट होता. स्वतंत्र फ्रान्सचे नेतृत्व आपल्याकडे आले पाहिजे हा द गॉलचा निर्धार त्या घोषणेने मुखर केला होता.

द गॉलच्या कर्तृत्वाला नवे आव्हान मिळाले होते.

(क्रमशः)

# निवडणूकपद्धती व घटनाबदल

वा. दा. रानडे

माणूसमधील आतापर्यंतच्या लेखात मुदतपूर्व निवडणुकीतील मतप्रवाहाचे विश्लेषण केले. या लेखात माझी स्वतःची भूमिका मांडीत आहे. मी समाजवादी असलो तरी कोणत्याही विशिष्ट पक्षास बांधून न घेता व्यापक समाजवादी चळवळीचा नेहमी पुरस्कार केला. या लेखामागेही तीच भूमिका आहे.

मतपेटी ही मोठी शक्ति आहे खरी पण त्या शक्तीला मर्यादा आहेत. मतपेटीने सरकार बदलता येते पण समाज बदलता येत नाही, समाजरचना बदलता येत नाही. भारतात लोकशाही मार्गाने आपणास समाजवाद आणावयाचा आहे. त्यासाठी निवडणुका व विधिमंडळे या साधनांचा प्रभावी वापर समाजवाद्यांनी अवश्य केला पाहिजे पण त्याचबरोबर या साधनांच्या मर्यादेचा विसर कधी पडू देता कामा नये. समाजपरिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर विधिमंडळातील कार्याला विधायक कार्य आणि अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण आंदोलन याची जोड सतत दिली पाहिजे. अलिकडे सर्वच पक्षांच्या समाजवाद्यांनी स्वतःला निवडणुकीच्या राजकारणात प्रमाणाबाहेर गुरफटून घेतले आहे. त्यांच्या कार्याच्या मी वर उल्लेखलेल्या इतर दोन आघाड्या जवळजवळ थंडावल्या आहेत. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका संपल्या की जिल्हापरिषदांच्या निवडणुका, त्या संपल्या की महापालिका व नगरपालिकांच्या निवडणुका, त्या मागोमाग ग्रामपंचायतींच्या निवडणुका असे एका निवडणुकीकडून दुसऱ्या निवडणुकीकडे हेच आमचे राजकारण अलिकडे झाले आहे.

मतपेटीचे सामर्थ्य मर्यादित असले तरी त्याचा जास्तीत जास्त उपयोग समाजवादाचे पाऊल पुढे टाकण्यासाठी केला पाहिजे. त्या दृष्टीने या निवडणुकीत पहिला महत्त्वाचा प्रश्न इंदिरा काँग्रेसबद्दल डाव्या पक्षांचे काय धोरण आहे, असावयास

हवे ? पूर्वीच्या अविभक्त काँग्रेसला विरोधाचे, डाव्या गटाचे धोरण होते. तेच इंदिरा काँग्रेसबद्दल चालू ठेवावयाचे का ? इंदिरा काँग्रेस आणि पूर्वीची काँग्रेस यांच्या स्वरूपात काही फरक आहे का ? सिंडिकेटच्या रूपाने प्रतिगामी गट बाहेर पडला. आम्ही आता समाजवादाच्या दिशेने वेगाने पावले टाकू असे इंदिरा काँग्रेसचे नेते म्हणत आहेत. पण काँग्रेसमधील फुटीनंतरचा गेल्या वर्ष सव्वा वर्षाचा अनुभव काय सांगतो ? बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे रद्द करणे ही दोनच धडाडीची पावले इंदिरा सरकारने गेल्या वर्षात टाकली. त्यामागे समाजवाद आणण्यापेक्षा काहीतरी भरीव करीत असल्याचा देखावा निर्माण करून आपल्या नेतृत्वाची पकड बसवणे, अविभक्त काँग्रेसचा बराच मोठा भाग, तसेच काही डाव्या गटांचा पाठिंबा मिळविणे हा इंदिरा गांधींचा खरा उद्देश होता तो सफल झाला. डाव्या गटांपैकी उजवे कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी यांनी इंदिरा सरकारला सर्व साधारणपणे पाठिंबा देण्याची भूमिका घेतली आहे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे यासारख्या एकदोन-उपायांनी काही समाजवाद येत नाही. योजनापूर्वक कार्यक्रमाची आखणी आणि तो कार्यक्रम अमलात आणणारी कार्यकर्त्यांची शिस्तबद्ध संघटना नसेल तर समाजवाद कागदावर आणि पुढाऱ्यांच्या भाषणातच राहतो. निष्ठावत समाजवादी कार्यकर्त्यांची संघटना उभारण्याकडे पंडित नेहरूंच्या काळापासूनच झालेले दुर्लक्ष आजही चालू आहे. हिकमती डावपेच लढवून सत्ता टिकविण्याच्या राजकारणातच इंदिरा गांधी अधिक गढल्या आहेत. अर्थव्यवस्थेवर बड्या भांडवलदारांची पकड कायम आहे. भाववाढ, वाढती बेकारी यासारखे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यात इंदिरा सरकारला अपयश आले आहे. जमीन सुधारणांची अंमलबजावणी फारच मदगतीने चालू आहे. कमाल जमीनधारणेची मर्यादा कमी करण्याची सूचना मुख्यमत्री परिषदेत इंदिरा गांधींनी मांडली पण मुख्यमंत्र्यांनी तिला विरोध केला. सधन शेतकरी हा काँग्रेसचा मुख्य आधार आहे. महाराष्ट्रात तर हे विशेष प्रकर्षाने दिसते. इंदिरा काँग्रेसचे नेते तोंडाने समाजवादाच्या कितीही घोषणा करीत असले तरी या सधन शेतकरी वर्गाला दुखवण्याची त्यांची तयारी नाही. आर्थिक विषमतेची दरी वाढत आहे. सरकारी खर्चाची ज्या पद्धतीने उधळपट्टी चालू आहे त्यात समाजवाद चा कोठे मागमूस दिसत नाही. अशा परिस्थितीत इंदिरा काँग्रेसच्या हाती सत्ता राहिल्याने समाजवाद येईल ही अपेक्षा करणेच चुकीचे आहे.

पूर्वीच्या अविभक्त काँग्रेसप्रमाणेच इंदिरा काँग्रेसला विरोधाचे धोरण सर्व डाव्या पक्षांनी स्वीकारायला हवे होते पण तसे घडले नाही. डाव्या गटांमध्ये गोंधळ निर्माण करून काही डाव्या पक्षांचा पाठिंबा मिळविण्यात इंदिरा गांधींना यश आले. उजव्या कम्युनिस्टांचा पाठिंबा त्यांनी मिळविला. प्रजासमाजवादी पक्षानेही त्यांच्याशी अर्थपूर्ण संवाद साधला. इंदिरा काँग्रेस आपल्याशी राष्ट्रीय पातळीवर

निवडणूक समझोता करतील अशी या दोन्ही पक्षांची अपेक्षा होती. त्या बाबतीत मात्र त्यांची निराशा झाली. राष्ट्रीय पातळीवर समझोत्यास इंदिरा काँग्रेसने नकार दिला. लोकसभेत निर्णायक बहुमत मिळविण्याचा इंदिरा काँग्रेसचा प्रयत्न आहे आणि त्यासाठी तर या निवडणुका आहेत. कम्युनिस्टांच्या पाठिंब्यानेच राज्य करावयाचे असते तर निवडणुका न घेता त्यांना ते करता येत होतेच पण कम्युनिस्टांना अजिबात दुखवून चालणार नाही कारण आपणास निर्णायक बहुमत मिळाले नाही तर कम्युनिस्टांवरच अवलंबून रहावे लागेल हे इंदिरा गांधींना माहीत आहे म्हणूनच कम्युनिस्टांसाठी काही जागा त्यांनी मोकळ्या सोडल्या.

डाव्यांची संयुक्त आघाडी उभारण्याचे प्रथमपासून प्रयत्न यावेळी झालेच नाहीत. अशी आघाडी उभी राहिली असती तर तिच्याशी राष्ट्रीय पातळीवर समझोता करणे इंदिरा काँग्रेसला भाग पडले असते. आपसातील मतभेद बाजूला ठेवून समाजवादी चळवळीच्या व्यापक हिताच्या दृष्टीने डाव्यांची आघाडी न उभारल्याबद्दल डाव्या नेत्यांनाच दोष द्यावा लागेल.

डावे पक्ष विस्कळीत असताना उजव्या गटांनी मात्र एकत्र येऊन संयुक्त आघाडी उभारली. सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ, स्वतंत्र पक्ष आणि सं. स. प. या चार पक्षांनी इंदिरा हटाव आघाडी स्थापन केली. संयुक्त समाजवादी पक्ष हा डावा पक्ष या आघाडीत सामील झाला असला तरी उजव्या पक्षांचेच या आघाडीत प्रभुत्व आहे. या निवडणुकीत डाव्या शक्ती विस्कळीत झाल्या, एवढेच नव्हे तर त्यांच्यातला एक पक्ष उजव्या आघाडीत मिळाला. संयुक्त समाजवादी पक्ष या आघाडीत सामील झाल्याने इंदिरा हटावचे त्यांचे उद्दीष्ट कितपत साधेल याची शंका आहे पण प्रत्यक्षात उजव्या गटांचे वजन वाढण्यास मात्र या धोरणाने मदत होणार आहे. सिंडिकेट आघाडीचा सर्वात जास्त फायदा जनसंघाला होणार आहे. या आघाडीत खंबीर लोकशाही सरकार स्थापण्याचे आश्वासन संयुक्त निवेदनात दिले असले तरी आघाडीतील घटक पक्षात धोरण व कार्यक्रमाबाबत एवढे अंतर्विरोध आहेत की जनहिताचा फारसा भरीव संयुक्त कार्यक्रम आणि असा कार्यक्रम तयार केला तरी तो कागदावरच राहतो असा चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर निरनिराळ्या राज्यात स्थापन झालेल्या संयुक्त आघाड्यांचा अनुभव आहे. सिंडिकेट आघाडीच्या हाती सत्ता आल्यास समाजवादाची पीछेहाट होईल तेव्हा अशा आघाडीस समाजवाद्यांचा पाठिंबा मिळणे शक्य नाही. संयुक्त समाजवादी या आघाडीत सामील झाले हा एक अपवाद आहे. समाजवादी कार्यक्रमाबद्दल त्यांचा आग्रह असेल तर ते आघाडीत फार काळ टिकू शकणार नाहीत.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आठ राज्यात काँग्रेसची सत्ता जाऊन तेथे बिगर काँग्रेस आघाड्यांची सरकारे काही काळ अधिकारावर आली पण सत्तेवर आल्यावर सारे पक्ष सारखेच, हा कटु अनुभव या सरकारांनी आणून दिला. काँग्रेस-

पेक्षा पुरोगामी, जनहिताचा कार्यक्षम व स्वच्छ कारभार जनतेला देण्यात ही सरकारे अयशस्वी ठरली. हा अनुभव लक्षात घेता निवडणुकीत समजा इंदिरा काँग्रेसचा पराभव होऊन सिंडिकेट आघाडीच्या हाती सत्ता आली तरी देशाच्या परिस्थितीत मोठा फरक पडेल असे मानण्याचे कारण नाही.

आपण लोकशाहीचे, स्वच्छ व काटकसरीच्या कारभाराचे पुरस्कर्ते असल्याचा आव सिंडिकेट आघाडीचे नेते आणीत आहेत पण बिहार व उत्तर प्रदेशातील त्यांच्या सरकारांचा कारभार प्रत्यक्षात ही तत्त्वे कशी पायदळी तुडवली जातात याचा निदर्शक आहे. येथे दोनच उदाहरणे देतो. पोटनिवडणुकीत पराभव झाल्यानंतर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग यांनी लोकशाही संकेतानुसार वास्तविक ताबडतोब राजिनामा द्यावयास हवा होता पण त्यांनी तसे केले नाही. बिहारच्या मंत्रिमंडळात ४१ मंत्री घेऊन मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांनी माजी काँग्रेस मुख्यमंत्री हरिहरसिंग यांनाही मागे टाकले. कारभारातील काट-


कोणतीही बाजी बेधडकपणे लावणारा देवआनंद म्हणजेच

निर्माता-दिग्दर्शक
**अमरजीत**

संगीत
**एस. डी. बर्मन**




भू :– देवआनंद, जहिदा, किशोरसाहू, सुधीर, जीवन, शत्रूघ्नसिंह व 'नवा चेहरा' जहिरा.

**कृष्ण-ड्रीमलॅण्ड,** २॥, ६, ९।
**रेक्स,** ११॥, २॥, ६, ९।
**गणेश,** ११॥, ३॥, ६, ९।
**कुमकुम,** ११।, २॥, ५॥, ९।
**सूर्य,** ११॥, २॥, ६, ९।
**रिव्होली** ११॥, २॥, ६, ९

**नंदी (बांद्रा)**, मीलन (सांताक्रुझ), लक्ष्मी (पार्ले), हंजर (जोगेश्वरी), नवरंग (अंधेरी), टोपीवाला (**गोरेगाव**), जोहरा (**मालाड**), जया (**बोरीवली**), कल्पना (**कुर्ला**), श्रेयस (**घाटकोपर**), नटराज (**चेंबूर**), कृष्ण (भांडूप), प्रभात–सपना (**उल्हासनगर**), नझराणा (भिवंडी).

– जनता प्रकाशन

कसरीच्या पोकळ गप्पा मग कशासाठी मारावयाच्या ?

इंदिरा कॉंग्रेस नको, सिंडिकेट आघाडी नको मग तुमचे मत कोणाला ? असा स्वाभाविकच प्रश्न उपस्थित होतो. डाव्या पक्षांचा उमेदवार उभा असेल तर त्याला आणि इंदिरा कॉंग्रेस व सिंडिकेट आघाडी यातूनच निवड करायचा जेथे प्रसंग असेल तेथे इंदिरा कॉंग्रेसला पाठिंबा द्यावा अशी भूमिका मी घेईन.

सध्याच्या निवडणूक चौकटीत अपरिहार्य म्हणून घ्यावी लागणारी ही भूमिका आहे. सध्याची निवडणूक पद्धती मला अनेक दृष्टींनी सदोष वाटते. मतदान सक्तीचे करण्यात यावे. अशी सक्ती लोकशाही विरोधी नाही काय असे यावर कोणी म्हणेल पण निवडणुकीतून लोकमताचा खरा कौल कळायला हवा असेल तर मतदान सक्तीचे हवे. अपवाद फक्त आजारी माणसांच्या बाबतीत करता येईल. कोणताच उमेदवार पसंत नसेल तर मत कोणाला द्यावयाचे असा प्रश्न यातून उपस्थित होतो त्याला माझे उत्तर असे की तटस्थ मत नोंदविण्याचीही मतपत्रिकेत तरतूद हवी.

विजयी पक्षास मिळालेली मते आणि जागा यांच्यात मेळ नसतो. पन्नास टक्क्या-पेक्षा कमी मते मिळवून एखादा पक्ष बहुसंख्य जागा मिळवितो व अधिकारारूढ होतो हे योग्य नाही. यासाठी विजयी उमेदवाराला केवळ इतर उमेदवारांपेक्षा जास्त नव्हे तर ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते पडली पाहिजेत अशी अट हवी. आणखी एक सूचना म्हणजे जेथे मतदानच ५० टक्क्यापेक्षा कमी होईल तेथील निवडणूकच रद्द समजण्यात यावी कारण बहुसंख्य मतदार जेथे मत द्यायला जात नाहीत ती कसली प्रातिनिधिक निवडणूक ?

या निवडणुकीत घटना दुरुस्तीच्या प्रश्नाला महत्त्व आले आहे. नवी घटना समिती बोलावून देशाच्या आजच्या परिस्थितीत योग्य अशी नवी घटना तयार केली पाहिजे असे माझे मत आहे. पण घटनादुरुस्तीच्या चर्चेत मूलभूत हक्क, राज्याची स्वायत्तता, केंद्र–राज्य संबंध या प्रश्नांवरच भर दिला जात असून एक महत्त्वाचा प्रश्न दुर्लक्षिला जात आहे. तो प्रश्न म्हणजे संसदीय लोकशाही आपल्या देशात यशस्वी झाली आहे काय व ती पुढे चालू ठेवाची काय ? ही पद्धती इंग्लंडवरूनच आपण उचलली पण इंग्लंडसारखे दोन तुल्यबळ पक्ष आपल्याकडे नाहीत. कॉंग्रेस प्रबळ पक्ष होता तोपर्यंतही या पद्धतीतील अडचणी जाणवल्या नाहीत. पण चौथ्या निवडणुकीनंतर त्या तीव्रतेने जाणवू लागल्या. कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत नसल्याने संधिसाधू आयाराम गयारामांचे फावले. त्यामुळे अस्थिर सरकारे निर्माण झाली. निवडणुकीत कोणत्याही एका पक्षास निर्णायक बहुमत मिळाले नाही तर केंद्रातही हीच अस्थिरतेची परिस्थिती निर्माण होण्याचा संभव आहे. यावर उपाय म्हणजे संसदीय लोकशाहीच्याऐवजी अध्यक्षीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार आपण करणे. सर्वच राजकीय विचारवंतांनी याचा गंभीरपणे विचार करून अध्यक्षीय लोकशाहीची मागणी करण्याची वेळ आता आली आहे असे मला वाटते. ☐ ☐ ☐

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## बंगाल जाणार ?

अलीकडे बंगालवर सर्वांचंच लक्ष केंद्रीत झालेलं आहे. महाराष्ट्रात लोकांचं काय मत आहे, ते बंगालबद्दल कसा विचार करतात हे एकदा जाणून घेण्याचा मी उत्सुकतेने प्रयत्न केला. त्या दृष्टीने अनेकांशी चर्चा केली. त्यात पुष्कळांनी एकच वाक्य उच्चारलेलं दिसून आलं. ते म्हणाले—

'बंगाल जाणार हे नक्कीच. लक्षणं तशीच दिसताहेत.'

मला नवल वाटलं. लोक असं का बोलतात? 'बंगाल जाणार' याचा अर्थ काय? आणि यांच्या म्हणण्याप्रमाणे समजा बंगाल गेला तर इतर सर्व प्रांतातील लोकांना उघड्या डोळ्यानी हे बघवेल? शेजारच्या घरी एखादी भयंकर घटना घडली तर इतर शेजारी ढाराढूर झोपू शकतील काय? कधीच नाही. मग इतक्या थंड वृत्तीने महाराष्ट्रातील काही लोकांनी 'बंगाल जाणार' असे का म्हणून म्हणावे? बंगालचे लोक त्यांचे कुणीच नव्हेत काय? उलट 'आम्ही बंगाल जाऊ देणार नाही' असे आवेशपूर्ण स्वरात यांनी म्हणायला हवे. बंगाल गेला तर महाराष्ट्र किंवा इतर राज्येही शिल्लकच उरणार नाहीत असा यांनी विचार का करू नये? एका प्रांतातील लोकांनी दुसऱ्या प्रांताकडे तिऱ्हाइताच्या नजरेने का बघावे हेच कळत नाही!

## बंगालला वाचवा!

बोस, साहा आणि चक्रवर्ती नावाच्या तीन तरुणांनी मिळून एक पत्र तयार केले व एका प्रसिद्ध दैनिक वृत्तपत्राकडे अलीकडेच पाठवले. पत्र मोठे विचार करण्याजोगे आहे. सर्वसाधारण माणसाच्या दृष्टिकोनातून ते लिहिलेले असल्याने परिणामकारकही आहे. त्यात त्यांनी सर्व बंगाली तरुणांना क्षणभर स्वस्थ बसून चालू परिस्थितीवर विचार करण्याची विनंती केलेली आहे. हे तरुण आपल्या पत्रात म्हणतात—

गेल्या दोन वर्षांपासून ह्या प्रांतात असाधारण घटना सतत घडत आहेत. देशात

सुधारणा घडवून आणण्याच्या हेतुने जी काही हिंसक कृत्ये करण्यात येत आहेत त्यांनी खरोखरच का ह्या असामान्य देशभक्तांच्या मनात वसत असलेला उद्देश साध्य होणार आहे? आज परिस्थिती तर ह्या थराला जाऊन पोहचली आहे की विद्यार्थी व शिक्षकांना वर्गात किंवा बाहेर मैदानातही आपण सुरक्षित आहोत असे वाटेनासे झाले आहे. मनाच्या ह्या अस्वस्थ अवस्थेत विद्यार्थी योग्य प्रकारे ज्ञानार्जन करू शकत नाहीत. नोकऱ्या करणारेही आपले काम मन लावून करू शकत नाहीत. कारण अंधार पडू लागल्यावर घरी परतताना 'आपल्यावर हल्ला तर होणार नाही ना' ह्या भितीने त्यांची मने ग्रासलेली असतात. वर्षानुवर्षे चालत आलेल्या व उत्तम शिक्षण देणाऱ्या प्रख्यात शिक्षणसंस्था ह्या भितीग्रस्ततेमुळे एकामागून एक पटापट बंद पडू लागल्या आहेत. त्यामुळे आजच्या नव्या पिढीतील अनेक मुले ह्या कारणास्तव अशिक्षितच राहण्याचा संभव आहे. मोठे झाल्यानंतर ती फक्त नेत्यांच्या पार्टीची निशाणे खांद्यावर वागवण्याच्याच कामाची राहतील. देशातले शिक्षणच हळूहळू नष्ट होऊ लागले तर उत्कर्ष होणार तरी कसा? ज्या लोकांनी देशासाठी जीवन खर्ची घातले व जगप्रसिद्ध झाले अशा महान् लोकांचे पुतळे देखील ह्या हल्लेखोरांनी शिल्लक ठेवले नाहीत! देशासाठी काहीतरी चांगले काम करण्याची ज्यांच्यामध्ये उमेद आहे व जे विद्यापीठातील अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी आहेत त्यांना आपल्या देशाचे भले करायचे आहे की एखाद्या परकीय राष्ट्राच्या ध्येय-वादानुसार वागायचे आहे? गुलामगिरीतून नुकत्याच मुक्त झालेल्या देशातील तरुणांना हे वागणे शोभते काय? सर्व तरुणांपुढे – मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे पुरस्कर्ते असोत – आम्ही वरील प्रश्न मांडू इच्छितो. त्यांनी त्याचा अवश्य विचार करावा.

ह्या क्षणी आपल्याला अनेक शत्रू आहेत – अंतर्गत आणि बाहेरचेही – जे आपल्या उज्वल परंपरेचा द्वेष करीत असतात आणि आज गेल्या शतकाचे जे काय अवशेष शिल्लक आहेत ते आपोआपच नष्ट होऊ लागले तर त्यामुळे त्यांना मनातून आनंदच होणार आहे. म्हणून अशा नतद्रष्टयांना शोधून काढा, हुडकून काढा आणि त्यांना सरळ साध्या भाषेत समजावन सांगा की बाबांनो, आता पुरे झालं हे; बस करा ही अघोरी कृत्ये, बंद करा ही मोडतोड – आपल्या प्रांताची आणि पर्यायाने देशाची सुद्धा – ज्या देशाची संस्कृती दहा हजार वर्षांची जुनी आहे!

बंगाल प्रांताचा दोन तृतीयांश भाग नकाशावरून नष्टच झाला आहे. उरलेला एक तृतीयांश भाग कसेतरी नाव टिकवून आहे. जर आपले तरुण आपला योग्य मार्ग चोखाळून त्याचे अवलंबन करणार नाहीत आणि आज जीवनाच्या सर्व क्षेत्रा-मध्ये (घरीदारीदेखील) माजलेली अराजकता दूर करणार नाहीत तर आधीच कमी कमी होत चाललेले बंगालचे वैशिष्ठय पूर्णतः विस्मृतीत बुडून नष्ट होऊन जाईल.

२७ फेब्रुवारी १९७१

## मला नाही शिकायचं !

'मम्मी, मुके स्कल नाई वन्नु' (आई ग, मला शाळेत नाही जायचं !) तीन वर्षाच्या बंटीचं गाऱ्हाणं सुरू होतं. तिला शाळेत दाखल करून दोनच दिवस झाले असतील. तिच्या उनाड स्वभावाला शाळेचा प्रेमळ 'जेल' रुचला नाही. आपल्या लहरीप्रमाणे घरातल्या सर्वांना नाचवणाऱ्या नि बेशिस्त वागणाऱ्या त्या गुंड पोरीला शाळेच्या घंटीची शिस्त पटणार कशी ? म्हणून तिची तक्रार सुरू होती आणि तिची आई तिला समजावीत होती-'बेटा, शाळेत गेलं म्हणजे हुषार होतं. तुझ्या बरोबरीची सगळी मुलं शिकतील, हुषार होतील, कोणी डॉक्टर, कोणी इंजिनियर...अन् तूं ?...तू अशीच राहशील...ढप्पू !'

'मला ढप्पूच राहू दे मम्मी. मला नाही शिकायचं...मला शाळेत नाही जायचं' हे त्या लहानग्या बंटीचं भाष्य !

हा मायलेकींचा संवाद शेजारच्या घरात स्पष्ट ऐकू येत होता. त्या संवादाचा प्रतिध्वनी ह्या घरात उमटू लागला. भूमिका त्याच-आई आणि मुलगी, फक्त सीन वेगळा. स्टेज बदललेले. ह्यातली मुलगी मोठी-हायस्कूलात शिकणारी, विचार करण्याची अर्धवट बुद्धी असलेली, वेळोवेळी वाद घालू इच्छिणारी...

ती पटकन् म्हणाली-'आई, बंटीला शाळा न आवडणं साहजिक आहे. मला-सुद्धा हे शिक्षण कधीकधी आवडत नाही. पुष्कळदा वाटतं, आपल्या जीवनात याचा काय उपयोग आहे ? आणि शिवाय...'

अगदी याच वेळी आईला Imprint मध्ये वाचलेली एक सुंदर कथा आठवू लागते. त्या कथेत सुरुवातीलाच एक लहान मुलगा म्हणतो-

'मी सहा वर्षांचा होतो तेव्हा मी एक सुंदर चित्र काढलं होतं. मग घरातल्या मोठ्या माणसांना दाखवलं पण त्यांना ते समजलचं नाही. ते म्हणाले-'आता हे पुरे कर नि इतिहास, भूगोल, गणित, व्याकरण हे विषय शीक' आणि...' पुढे तो मुलगा म्हणतो, 'मी मोठेपणी केवढा तरी मोठा कलाकार झालो असतो. पण ह्या मोठ्या माणसांमुळेच होऊ शकलो नाही. Grown-ups are like that !...'

आईला वाटतं-दोन पिढ्यात निर्माण झालेलं हे अंतर नेहमी असंच का राहणार आहे ?...

आईची तंद्री तुटते जेव्हा मुलगी आपलं अर्धं सोडलेलं वाक्य पूर्ण करताना म्हणते-'...शिवाय कित्येक धडे असे आहेत की जुनाट विचारांच्या जुनाट लेखकांनी ते लिहिलेले. त्यांचे विचार आम्हाला पटत नाहीत अन् म्हणून अशा धड्यांचा अभ्यास करावासा वाटत नाही. ह्या अशा जुनाट धड्यांचा अभ्यास करण्याची आमच्यावर जबरदस्ती का ?...काळ बदलतोय् ना सारखा ?...'

खरंच, काळ सारखा बदलत आहे. शिक्षणसुद्धा त्या प्रमाणात बदलायला नको का ?...

ती छोटी बंटी, तो कथेतला मुलगा अन् ही हायस्कूलमधली मुलगी... ह्या सगळ्यांचं बरोबर आहे. चुकतं ते आमचं—वडील माणसांचं. मुलांच्या दृष्टिकोनातून आम्ही विचार का करीत नाही ? त्यांना पटेल, रुचेल अशा तऱ्हेचं शिक्षण त्यांना का देऊ शकत नाही ; आम्ही कशात एवढे अडकलो आहोत की त्या उमलत्या फुलांकडे आमचे दुर्लक्ष होत आहे ?...

...ह्या प्रश्नांची उत्तरे कोणी देईल काय ?

## निरर्थक वाद

सध्या कलकत्यात खास महिलांचा एक सर्वोदयी कॅंप सुरू आहे. बंगालमध्ये अशा तऱ्हेचा हा कॅंप पहिलाच म्हटले तरी चालेल. ह्या सर्व शिबिरार्थींचे नेतृत्त्व करणाऱ्या एक भगिनी खास ह्याच कामाकरता अन्य ठिकाणाहून आल्या आहेत. एकदा त्या काही शिबिरार्थींसमवेत एस्प्लेनेडपासून आपल्या निवासस्थानी परतण्या-साठी म्हणून ट्रामस्टॉपवर उभ्या असताना त्यांना बरीच गर्दी दिसली. थोड्या वेळातच त्यांच्या लक्षात आले की नेताजी सुभाषचंद्राच्या जन्मदिनानिमित्त भली-मोठी मिरवणुक येत असून ती बघण्यासाठी ही गर्दी जमलेली आहे. ह्या सर्व भगिनी आपापसात बोलत असताना बंगालच्या बाहेरून आलेल्या त्या बाई म्हणाल्या—'नेताजींच्या जन्मदिनाची ही सुटी फक्त बंगालमध्येच असते की सर्व भारतात असते ?' अर्थात बरोबरच्या महिलांना उद्देशूनच त्यांनी हा प्रश्न केला होता, पण त्यांच्याऐवजी जवळपास उभ्या असलेल्या एका अनोळखी गृहस्थांनी आपणहून ह्यांनाच प्रश्न केला—'तुम्ही आहात कोण कोठून आलात ? अन् हे विचारायचं कारण काय ?'

'कारण काय असणार ? मला माहिती हवी म्हणून विचारतेय्.' नम्रपणे बाईंनी उत्तर दिलं.

'माहिती कशासाठी हवीय् ?... आणि तुम्ही काही इथल्या दिसत नाही... पंजाबच्या आहात काय ?'

—पुन्हा प्रश्न तयारच.

बाई म्हणाल्या—'मी इथली नाही की पंजाबची नाही. मी आहे भारताची.'

'अन् ही खादी...हे ढोंग कशासाठी ?... आणि करायचय् काय तुम्हाला ही माहिती गोळा करून ?... अहो, तुम्ही इलेक्शनमध्ये निवडून तर या...नंतर तुम्ही मेल्यावर तुमचीही अशीच मिरवणुक काढू आम्ही बरं !'

हे ऐकून बाई भलत्याच चकित झाल्या. ह्या गृहस्थाशी वाद घालण्यात अर्थ

नाही असा विचार करून त्या चूप बसल्या. पांढरी स्वच्छ खादी वापरणारे अंतःकरणाने काळे असतात असाही एक सर्वसाधारण समज आहे ह्याचीसुद्धा बाईंना कल्पना नव्हती.

काल सायंकाळी त्यांची भेट झाली असताना त्यांनी सहज मला विचारलं—

'इथले लोक असे एकदमच हमरीतुमरीवर का येतात हो?'

'मी म्हटलं–' का? काय झालं?'

आणि त्यांनी वरील अनुभव सांगितला. आता आश्चर्य करण्याची पाळी माझ्यावर आली.

## अ-नक्षलवादी मुले

जमशेटपूरला नक्षलवादी मुले पकडल्याच्या बातम्या बहुतेक रोजच प्रसिद्ध होत आहेत. अर्थात् अनेक असाधारण घटना देखील घडल्या आहेतच व त्यामुळे सर्वत्र भीतीचं वातावरणही निर्माण झालं आहे हे नक्कीच. असल्या बेकायदेशीर वागण्याला पोलिसांकडून जरूर आळा घातला जावा. शांतताप्रिय जनतेला हेच हवे आहे. तरीपण नक्षलवादी समजून वाटेल त्या मुलांना पकडून नेणं हे मात्र पोलिसांना शोभत नाही. पोलिसांच्या ह्या कृत्याला जनता प्रतिकार करीत नाही ही आणखी आश्चर्याची गोष्ट आहे. हे पोलिस मध्यरात्री सशस्त्र पोलिसांना बरोबर घेऊन कुणाच्याही घरात तपासणीसाठी जातात आणि निरपराध मुलांना बदमाष गुन्हेगारांप्रमाणे धरून पकडून पोलिस स्टेशनवर घेऊन जातात. पूर्ण चौकशी होईपर्यंत त्या मुलांना तेथेच कित्येक दिवस अडकून पडावे लागते. चौकशीनंतर त्यांना एकतर सोडून देतात किंवा जेलमध्ये पाठवतात. आतमध्ये इतर अनेक गुन्हेगारांच्या संपर्कात ते येतात आणि नकळत त्यांचेवर निराळेच परिणाम होतात, जेणेकरून भावी जीवन बिघडण्याचा संभव असतो.

काही मुले तर दुसऱ्यांदा आणखी निराळ्या कारणास्तव पकडली जातात. कदाचित् समाजात असेही काही लोक असावेत की जे नियमितपणे पोलिसांना ह्या मुलांविषयी चुकीच्या बातम्या पोचवण्याचे काम करीत असतील.

यासाठी पोलिसांना प्रथम सर्व माहिती गोळा करून नंतरच त्या मुलांना ते दोषी ठरल्यास पकडून न्यावे, म्हणजे निरपराध मुलांचा त्रास तरी वाचेल. ह्या बाबतीत मुलांना पकडतेवेळी ते विद्यार्थी असल्यास त्यांच्या शिक्षणसंस्थांकडून मिळणारी ओळखपत्रे (Identity Cards) किंवा ते नोकरी करणारे असल्यास त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात येणारी ओळखपत्रे यांचा उपयोग अवश्य करावा व निरपराध मुलांचा त्रास वाचवावा अशी एक सूचना जमशेटपूरच्या काही लोकांनी केली आहे. ◻ ◻ ◻

# यु. गो. – नवकाँग्रेस युती

निवडणूक गोमंतकाच्या अंगात आली आहे. घुमू लागली आहे.

तशी ती सर्वच देशात आली. पण गोव्याचे तसे सारेच न्यारे. सुशेगाद.

प्रथम येत होत्या त्या नुसत्याच बातम्या. काँग्रेस, महाराष्ट्रवादी गोमंतक या स्थानिक पक्षाशी युति करणार; काँग्रेस, युनायटेड गोवन्स पक्षाशी निवडणूक समझोता करणार; प्रसपशी करार करणार. मात्र त्यात एकही बातमी अशी नव्हती की नवकाँग्रेस स्वतःच्या हिमतीवर निवडणुका लढविणार !

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम काकोडकर दिल्लीत ठाण मांडून बसले होते. यु. गो. नेते डॉ. जॅक सिकेरा दिल्ली वाऱ्या करीत होते. मुख्यमंत्री बांदोडकरांना दिल्लीहून आवतणे येत होती. अखेर अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी धावपळ झाली आणि दक्षिणेत काँ. यु. गो. ला पाठिंबा देईल तर उत्तरेत यु. गो. काँग्रेसला पाठिंबा देईल असे ठरले.

गंगेत एकदाचे घोडे न्हाले.

पण जातीयवादी पक्ष म्हणून ज्या यु. गो. ला काँग्रेसने नेहमी हिणवले, दूषणे दिली त्यांच्याशीच युती कशी केली ? असला प्रश्न कुणी विचारू नये.

म. गो. चे बहुसंख्य मतदार हिंदू. त्यामुळे तोच खरा जातीयवादी. यु. गो. चे मतदार विशेषतः ख्रिश्चन, अल्पसंख्य. तो कसा जातीयवादी असू शकेल ? शिवाय 'गोव्याचे स्वतंत्र राज्य' या एका समान भूमिकेवरती तरी ते एकत्र येऊ शकतात ? उत्तरेतली जागा यु. गो. ला कधीच मिळणे शक्य नाही. मग ती काँग्रेससाठी सोडून देण्यात त्या पक्षाचे तरी काय जाते ? ही साधी विचारसरणी !

श्री. बांदोडकरांनी म्हणे बाईंना स्पष्टच सांगितले की नवकाँग्रेसला जरूर पाठिंबा देऊ. पण उमेदवार म्हणून पुरुषोतम काकोडकर नकोत. बाई म्हणाल्या, अटी नकोत.

आणि अखेर श्री. काकोडकर हाती माळ घेऊन उभे राहिले.

हा माणूस हाडाचा राजकारणी, पक्का चिवट ! १९६२ साली काँग्रेस अध्यक्षपद घेऊन एकदा बसला तो कायमचाच ! अनेक स्थित्यंतरे झाली ! त्यांच्यावरती अविश्वास ठराव आले. संमत झाले. प्रदेश काँग्रेसच्या तीसपैकी वीस सदस्यांनी

नेहमीच त्यांच्याविरुद्ध मतदान केले. वरिष्ठात तक्रारी केल्या. पण हा माणूस अचल आहे. नेहरूकृपेने अध्यक्षपदाची गादी संभाळीत आहे. केंद्रीय नेतृत्वाचे दुर्लक्ष आणि काकोडकरांच्या सततच्या कारवाया यामुळे एक काकोडकर सोडले तर गेल्या नऊ वर्षात काँग्रेसला अखंड गळती लागली आहे. अनेक रथी महारथी केवळ काकोडकरांमुळे पक्ष सोडून गेले. जे राहिले ते स्वार्थी आणि आपमतलबी! त्यांच्यामागे सावलीसारखे राहिले ते फक्त विद्यमान सेक्रेटरी श्री. प्रफुल्ल प्रियोळकर. (यांना येथे काकोडकरांची ' विडो ' म्हणतात.)


या निवडणूक युतीनंतरही अनेकानी बंड पुकारले. ते खरे काकोडकरांविरुद्ध. दक्षिणेत श्रीमती आयरिन वार्देश या अखिल भारतीय सदस्या. त्यांचे नाव केंद्रीय नेतृत्वाने प्रथम मंजूर केले होते. त्या आज काँग्रेसने पाठिंबा दिलेल्या यु. गो. उमेदवाराविरुद्ध दंड थोपटून उभ्या आहेत.

दोन जागांसाठी चौदा उमेदवार उभे असले तरी दोन्ही ठिकाणी खरी लढत आहे ती उत्तरेत श्री. माधव तळावलीकर (म. गो.) आणि श्री. पुरुषोत्तम काकोडकर (काँ. स.) तर दक्षिणेत श्री. एराज्मु सिकैरा (यु. गो.) आणि श्री. रेद्रुआरद डिकॉस्टा ( म. गो. ) यांच्यातच! बाकी सारेच नगण्य !

आजचे हे चित्र कोणत्याही अखिल भारतीय पक्षाला गोव्यात स्थान मिळवून देणारे दिसत नाही. त्यातून यु. गो. शी सोबत करून आणि काकोडकरांना उभे करून नवकाँग्रेस जनमानसात पूर्वीच डागळलेली नवकाँग्रेसची प्रतिमा पार काळीकुट्ट करून टाकली आहे या युतीने.

त्यामुळे पुनश्च एकवार म. गो. आणि यु. गो. यांचेच उमेदवार निवडून आल्यास आश्चर्य नको.

म. गो. पासून घटस्फोट घेतलेले उपसभापती श्री. मंजू गावकर व माजी खासदार श्री. जनार्दन शिंक्रे दक्षिणेत अपक्ष म्हणून उभे आहेत. जाणकारांच्या मते यु. गो. उमेदवार निवडून येण्यास मदत व्हावी म्हणून स्वतःचे नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्याची ही खास प्रवृत्ती!



# पूरब और पश्चिम

## मसालेदार ध्येयवाद

'शहीद', 'उपकार', 'यादगार' आणि आता 'पूरब और पश्चिम'. मनोजकुमारच्या प्रेरणेने निघालेले हे चार चित्रपट. सगळे ध्येयप्रेरित, हेतूप्रधान. पण यशाच्या दृष्टीने उतरणीला लागलेले. या प्रत्येक चित्रपटाबरोबर मनोजचा हेतू निष्प्रभ होत गेला आहे आणि हीणकस मनोरंजन वाढलेले आहे

'पूरब और पश्चिम' हा तर 'माल' आणि 'मसाला' या दोन्ही गोष्टींनी भरघच्च भरलेला २१ रीळांचा चित्रपट आहे. त्यात दाखविलेला पश्चिमी संस्कृतीचा बेगडीपणा जितका खोटा आहे, तितकीच पौर्वात्य (म्हणजेच भारतीय) संस्कृतीची महत्ता तकलुपी आहे. व्ही. एन. रेड्डी यांचे सुरेख छायाचित्रण आणि मनोजकुमार यांचे गतिमान, कुशल दिग्दर्शन नसते तर 'पूरब और पश्चिम'ची अवस्था बिकट होती. या सुमारे तीन तास चालणाऱ्या चित्रपटातला एकही प्रसंग वास्तव, जीवनदर्शी वाटत नाही. मनोजकुमार यांच्या दिग्दर्शनातही दिसते ती तांत्रिक कुशलता.

तशी पौर्वात्य संस्कृतीचे प्रेम आपल्या चित्रपट निर्मात्यांना फार. आपल्या महान संस्कृतीचे आदर्श जेवढे चित्रपट निर्मात्यांनी जपले आहेत तेवढे इतर कोणीच त्यांची काळजी केलेली नाही. मनोजकुमार यांनी निवडलेल्या या विषयाला तसे भावनिक आवाहन फारच आहे. प्रत्यक्षात ठाऊक नसलेल्या भारतीय संस्कृतीचा पडद्यावरील हा थोर विजय लोकांच्या कसा काळजाला स्पर्श करील. पण प्रत्यक्षात हा विजय साध्य करताना मनोजकुमारने प्रतिस्पर्धी बाजू मुद्दामच कमकुवत केली आहे. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणारी यातील नायिका प्रीती–तिच्या एका हातात सदैव दारूचा ग्लास व दुसऱ्या हातात सिगरेट आणि अंगावर मिनी स्कर्ट, बापाला ती सामोरी जाते तेव्हा त्याच्या तोंडावर सिगरेटच्या धुराचा लोट सोडते, मनोजच्या हातात गीता पहाते तेव्हा विचारते, 'ही कोणती नॉव्हेल आहे ?'

तर अशी ही इंग्लंडमध्ये रहाणारी प्रीती. तिच्यावर भारत नामक भारतीय

आदर्श जपणाऱ्या आपल्या हिरोचे प्रेम बसते. तिचे भारतीय नारीत रूपांतर करण्याचा तो मनोमन आत्मविश्वासपूर्वक विडा उचलतो आणि तिला भारतात घेऊन येतो. चांगल्या भारतीय संस्काराचे महत्त्व तिला वेगवेगळ्या प्रकारे पटवून देतो. तिलाही ते जाणवते व पटते. ती मिनीस्कर्ट टाकून देते व छानशी साडी नेसून देवळात प्रार्थना करू लागते.

कथानकाचे हे मुख्य सूत्र असले तरी त्यात अनेक उपकथानके आहेत. देशप्रेमाची कहाणी आहे, टाकलेल्या बायकोची कहाणी आहे, वाया गेलेल्या मुलाची कहाणी आहे, नायकाच्या मित्राच्या अबोल प्रेमाची कहाणी आहे. याशिवाय नायिकेवर नजर ठेवणारा पाषाण हृदयी व्हीलन आहे, जगातील नाईट क्लबची सफर आहे, कृष्ण कल्टचे भक्तीवेडे लोक आहेत. या साऱ्या गोष्टी इतक्या झपाट्याने घडत जातात की चित्रपट संपला की पात्रांचा आणि त्यांच्या संबंधित कथांचा गोंधळ होतो, दृश्यांची गल्लत होते. मोटार रेसमधल्या मोटारी क्षणार्धात डोळ्यासमोरून निघून जाव्या आणि समोर केवळ मोकळा रस्ता दिसावा तशी मनाची अवस्था होते. समोरचा पडदा जितका कोरा करकरीत, तितकेच आपले मनही परिणामाच्या दृष्टीने कोरे करकरीत.

चित्रपटात अशोककुमार नामधारी आहे. प्राणची मात्र कमाल आहे. विशेष म्हणजे त्याला या चित्रपटातील मेकअप इतका खुलून दिसतो. मनोजची पुटपुटत असल्यासारखे बोलण्याची पद्धत व निर्विकार चेहरा. उपमा द्यायचीच तर खांबाऐवजी प्रदीपकुमारची द्यावी. (पण प्रदीपकुमारचा नुसता अॅपीअरन्स तरी बरा आहे!) सायरा म्हणजे कचकडी बाहुलीच. या चित्रपटात सायराचे मन भारतीय संस्कृतीकडे आकृष्ट करण्यासाठी एक बाहुल्यांचे नृत्य आहे. त्यातली मेमसाब बाहुली व रांगडा पंजाबी यांचा गीतबद्ध संवाद चालू असतो. मध्येच बाहुलीच्या जागी सायरा व बाहुल्याच्या जागी मनोज येतो व गाणे चालूच रहाते. बाहुलीची सायरा होणे व सायराचे बाहुली होणे प्रतिकात्मक मानले तर? आयडिया छान आहे.

कल्याणजी आनंदजी यांच्या सगळ्या सुरावटी आता तशा परिचयाच्या आहेत. त्यात नाविन्य म्हणून राहिले नाही. पण या चित्रपटात त्यांनी कृष्ण कल्टच्या 'हरे राम, हरे कृष्ण'चे कंपोझिशन अतिशय छान केले आहे. त्याचप्रमाणे 'रघुपती राघव—' हे भजन गिटारवर अतिशय आकर्षकपणे वाजविले आहे. 'हरे राम'मध्ये तर आपणच तल्लीन होऊन जातो व 'रघुपती'चे सूर दीर्घकाळपर्यंत कानात गुणगुणत रहातात.

**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

## २७ फेब्रुवारी ते ५ मार्च १९७१

**मेष :** शरीरप्रकृती पहिले दोन दिवस जरा नरमच राहील. उष्ण विकाराचा त्रास होईल. गृहस्वास्थ्य बिघडेल. धनस्थिती चांगलीच राहिल. प्रवास योग येईल. प्रवासात सरकारी अधिकाऱ्यांना त्रास होईल. सोमवार-मंगळवार मानसिक त्रास होईल. काहीतरी धार्मिक समारंभ घरात होण्याचा योग आहे. बुधवार-गुरुवार येणाऱ्या रकमा हातात पडतील.

विद्याभ्यासात भरपूर यशप्राप्ती होईल. डिपार्टमेंटल परीक्षाला चांगल्या तऱ्हेनी पास होता येईल. संततीचा भाग्योदय होईल. २१ ते २४ वयातील व्यक्तींना याचा अनुभव येईल. विवाहितांचा मानमरातब वाढेल. भागिदार चांगले वागणार नाहीत- ४२ वयापुढील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. अष्टमातील गुरु-मंगळ युती अचानक धनलाभ घडवून आणिल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२।३ या घरातून आहे. ते साधारण आहे. शुभतारखा ३।४।५.

**वृषभ :** शरीरप्रकृती चांगली राहील. थोडासा मधुमेहाचा विकार वाढेल. धनस्थिती अत्यंत समाधानकारक राहिल. सरकारी येणे वसूल होईल. धार्मिक कार्याकरता प्रवास होईल. यात्रेला जाण्याचा योग आहे. घरात नातलग मंडळी बुधवार-गुरुवारी येतील. धाकट्या भावंडांकडून सोमवार-मंगळवारी त्रास होण्याचा संभव आहे.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. प्रकाशक, लेखक वगैरेंना सप्ताह प्रगती पथावर नेणारा आहे. सरकारी मदत सहज प्राप्त होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. मित्रांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. पहिले दोन दिवसानंतर भागीदार जरा नीट वागणार नाहीत. पत्नीशी मतभेद होण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१।२ या स्थानातून आहे ते चांगले आहे. एकंदर सप्ताह शुभ फलदायी आहे.

**मिथून :** शरीरप्रकृती चांगली राहिल. धनस्थितीला थोडासा कमीपणा येईल. भावंडांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. सरकारी अधिकारावर असलेल्या धाकट्या भावंडांची फारच मदत होईल. घरच्या कुटुंबातील मंडळीसह यात्रेला जाण्याचा योग येईल. सोमवार-मंगळवार हा योग जास्त आहे. व्यापारधंद्यात जरा मंदी जाणवेल. भागीदार मनापासून मदत करणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत व्यापारातील पत दशमस्थान गुरु दृष्ट असल्यामुळे जाणार नाही हे निश्चित.

विद्याभ्यासात अपयश येईल. शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अपयश येईल, संतती नीट वागणार नाही. प्रेमप्रकरणात सापडलेल्या मुलांकरता खस्ता खाव्या लागतील. ३६ ते ४२ वयातील व्यतींचा भाग्योदय होईल. घराची अर्धवट असलेली कामे मनासारखी होतील. हा अनुभव घराच्या कंत्राटदारांना जास्त येईल. चंद्राचे भ्रमण १०।११।१२।१ या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शुभतारखा २७।२८।१।२।५.

कर्क : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानाचा अधिपति रवी स्वगृहावर पाहतो, तो चांगला आहे. सरकारकडून येणारी रक्कम हातात पडेल. थोडीशी आत्मघातकी वृत्ती वाढेल. प्रवासाचा योग येईल. तो टाळावा. घरात वृद्ध माणूस आजारी पडेल. पत्नीकडून थोडासा मनःताप देणारी वागणूक होईल. बुधवार-गुरुवारी मित्रमंडळी येऊन दिवस आनंदात जाईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. त्यामुळे भाग्योदय होईल. गुरु मंगळाचा अन्योन्य योग संततीशी चांगले संबंध राखील. मुलांचा भाग्योदय होईल. विशेषतः मुलींचा प्रेमविवाह होण्याचा चांगलाच योग आहे. २४ ते २७ या वयातील व्यक्तींना हा योग जोरदार आहे. शुक्रवार या दृष्टीने फार चांगला आहे.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११।१२ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. सबंध सप्ताह शुभ फलदायी आहे.

सिंह : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थितीत मनासारखी सुधारणा होईल. बुधवारी अचानक धनलाभ होईल. भावंडे जरा तुटकपणानी वागतील. सार्वजनिक कामाकरता प्रवास योग येईल. त्यात चांगलाच मानसन्मान होईल. घरी काहीतरी शुभ समारंभ होईल. विवाहाची बोलणी होण्याचा योग गुरुवारी आहे. माला योग झाला आहे. तो फार चांगला आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. मिलिटरीत असलेला दूर गेलेला मुलगा अचानक शनिवार-रविवारी घरी येण्याचा योग आहे. शत्रूनाश होईल. भागिदारांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. व्यापारधंदा चांगला चालेल. बौद्धिक व्यवसायीकांची चांगलीच प्रगती होईल. सरकारी प्रकाशनाची कामे मिळतील. मित्रांची मदत चांगलीच होईल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१०।११ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शुभ तारखा १ ते ५.

कन्या : शरीरप्रकृती साधारण राहील. पैशांची अडचण निर्माण होईल. संततीकरता खर्च करावा लागेल. भावंडांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. घरात थोडेसे मतभेद निर्माण होतील. घरासंबंधी विनाकारण कटकटी निर्माण होतील. प्रवास योग बुधवारी-गुरुवारी येईल. एखाद्या सहलीला जाण्याचा योग येईल. शुक्रवारी घरात शुभसमारंभ घडून येईल.



पाचूच

विद्याभ्यासात संपूर्ण अपयश येईल. याचा अनुभव सोमवार-मंगळवारी येईल. मुलांकडून मनाला कष्टी करणारी वागणूक घडेल. पत्नीचे सहकार्य उत्तम मिळेल. मित्रमंडळी चांगली वागतील. व्यापारधंद्यात जरा मंदी येईल. शत्रूनाश मात्र निश्चित होईल. ३६ ते ४२ वयातील व्यक्तींना सार्वजनिक कामात अपयश येईल.

चंद्राचे भ्रमण ७।८।९।१० या स्थानातून आहे ते, तितकेसे चांगले नाही. शुभ तारखा ३ ते ५.

तूळ : शरीरप्रकृती जराशी बिघडेल. धनस्थिती बरी राहील. सुखात व्यत्यय येईल. घरात मतभेद होतील. भावंडांकडून पैशाची खूपच मदत होईल. पराक्रम हातून होईल. पत्नीकडून सर्व कामात मदत होईल. ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. विद्येमुळे भाग्योदय होईल. संततीचा उत्कर्ष होईल. मातुल घराण्याकडून पैशाची मदत होईल. फॅन्सी वस्तूंचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना अमाप फायदा होईल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना प्रगतीपर दिवस जातील. मित्रमंडळी सर्व प्रकारे मदत करतील. चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानातून आहे. ते फार चांगले आहे. शुभ तारखा २७।२८।३।४।५.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगली राहील. मंगळ-गुरूचा अन्योन्य योग फारच चांगला आहे. प्रवासयोग येईल. पण प्रवासात त्रास होईल. घरात काही तरी शुभ प्रसंग घडून येईल. अचानक धनलाभ होण्याचा योग आहे. सरकारी कामात संपूर्ण यश येईल. इंडिकेटची राशी आहे. सार्वजनिक कामात यशप्राप्ती होईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. २४ वयाच्या पुढील व्यक्तींना जास्त मान-मरातब मिळेल. सरकारी नोकरांना बढती मिळण्याचा योग आहे. मालायोग आहे. तनुस्थानापासून षष्ठस्थानापर्यंत सर्व ग्रह उत्तम आहेत. हा मालायोग आहे. बुधवारी, गुरुवारी भागीदारांकडून सर्व प्रकारची मदत होईल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७।८ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा २७।२८।२।३.

धनु : शरीरप्रकृतीला अपचनाचा त्रास होईल. थोडीशी मनाची अस्वस्थता वाढेल. व्ययातील गुरू थोडीशी सुखहानी दाखवितो. पण तो स्वगृहाशी ९।५ योग करतो आहे. त्यामुळे शनिवार-रविवार घरात काहीतरी समारंभात भाग घ्यावा लागेल. दोनही दिवस चांगले जातील.

विद्याभ्यासात अडचणी, संततीला विद्येत यशप्राप्ती होईल. मेकॅनिकल, मेडिकल कोर्स घेणारांना यश प्राप्त होईल. २८ ते ३२ वयातील व्यक्तींना सरकारी नोकरीत बढती, भागीदारांची चांगली वागणूक व व्यापारात उत्तम धनप्राप्ती होईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा २७।२८।३।४।५.

**मकर :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. स्वभावात थोडासा हट्टीपणा येईल धनस्थानाची स्थिती सुधारू लागेल. शनिवारी, रविवारी नातलग मंडळी एकत्र येतील. दिवस आनंदात जातील. सोमवार, मंगळवार घरात कलह झाल्यामुळे मनःस्वास्थ्य बिघडेल. सुखनाश होईल. घरासंबंधी प्रश्न उपस्थित होतील.

चद्राचे भ्रमण ३।४।५।६ या स्थानातून आहे. ते बरे आहे. शुभ तारखा २७।२८। ३।४।५.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत अपेक्षेप्रमाणे सुधारणा होईल. प्रवास योग येईल. धार्मिक यात्रेकरता बाहेर पडावे लागेल. गृहकलह वाढतील. दशमातील गुरू सर्व अडचणीमधून सुखरूप पार पाडील. सरकारी कामात संपूर्ण यश प्राप्ती होईल. अचनाक धनलाभ होण्याचा योग गुरुवारी आहे.

विद्याभ्यासात नेत्रदीपक उन्नती होईल. सरकारकडून पैशाची मदत चांगली होईल. लग्नाची मागणी आपोआप येऊन प्रेम विवाह जमेल. २७ ते ३२ वयातील व्यक्तिना हा योग जोरदार आहे. घरात सर्व मंडळींकडून प्रत्येक कामात मदत होईल. संततीचा उत्कर्ष होईल. उद्योगधंद्यात खूप प्रगती घडवून आणणारा सप्ताह आहे.

चंद्राचे भ्रम २।३।४।५ या स्थानातून आहे. ते बरे आहे. शुभ तारखा २७।२८। ३।४।५.

**मीन :** शरीरप्रकृती अत्यंत चांगली राहील. द्वी पंचनवमे गुरु:। गुरु नवना आहे. मालायोग झालेला आहे. मंगळ दशमात चांगलाच आहे. धनस्थिती फारच चांगली राहील. वाचाशुद्धी कमी होईल. वाणीत कठोरपणा येईल. भावंडे चांगली वागतील. पत्नी माहेरी जाण्याचा योग आहे. घराचें प्रश्न समाधानकारक सुटतील. सार्वजनिक कामात अपयश येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. कारकाधिपति गुरु अत्यंत शुभ योग करतो आहे. संततीचा भाग्योदय होईल. जे काम हातात घ्याल त्यात यश प्राप्त होईल. गुरु मंगळांचा अन्योन्य योग फारच चांगला आहे. बौद्धिक व्यवसायातील विशेषतः कवी, कलाकार, चित्रकार, ज्योतिषी यांना दिवस फारच चांगले आहेत. करतील त्यात यशप्राप्त होईल. लोखंडाचे सोने होईल.

चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. सर्व सप्ताह शुभ आहे.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

मुंबईच्या समग्र निवडणुकक्षेत्राचे
वास्तववादी दृष्टिकोनातून रेखाटलेले चित्र सादर करणारा
वाचकांच्या विचारांना चालना देणारा
मुंबई मतदानदिनाच्या ऐन मोक्यावर प्रसिद्ध होणारा

# माणूस
# मुंबई निवडणूक विशेषांक

प्रसिद्धी : शनिवार, दिनांक ६ मार्च १९७१
किंमत : एक रुपया : पृष्ठसंख्या अंदाजे १००

'माझा जाहिरनामा' सदरापासून सुरू असलेल्या निवडणूक काळातील विधायक विचारप्रसाराच्या 'माणूस' कार्याची या विशेषांकाच्या प्रकाशनामुळे जणू यशस्वी सांगताच होत आहे.

### विक्रेत्यांसाठी

- प्रतींची मागणी कृपया वाढवू नये.
- कागद टंचाईमुळे प्रतींची संख्या मर्यादित. मागणी कमी होणार असल्यास कार्यालयाकडे तसा खुलासा मात्र कृपया ताबडतोब नोंदवावा. काही खुलासा न आल्यास नेहमीची मागणीच गृहीत धरण्यात येईल.